# अभंग - ज्ञानेश्वरी

## अध्याय नववा

आतां [१] अवधान । एकलें चि द्यावें । मग पात्र व्हावें । सर्वसुखा ।।१।।
ऐसें असे माझें । प्रतिज्ञावचन । ऐका संतजन । उघड हें ।।२।।
तुम्हां सर्वज्ञांच्या । सभेमाजीं येथ । नसें हो बोलत । [२] आढ्यतेनें ।।३।।
द्यावें अवधान । तुम्हीं संतजनीं । माझी विनवणी । [३] सलगीची ।।४।।
जरी तुम्हांऐसीं । माहेरें श्रीमंत । [४] लळे पुरे होत । लळ्यांचे हि ।।५।।
मनोरथांचें हि । जे का मनोरथ । सर्व ते निभ्रांत । पूर्ण होती ।।६।।
प्रसन्नतारूपी । मळे भरा आले । कृपादृष्टिजलें । आपुलिया ।।७।।
थकलों भागलों । सुखें मी लोळेन । साउली देखोन । आतां तेथें ।।८।।
डोह सुखरूपी । अमृताचे तुम्ही । [५] लाहूं ओल आम्ही । निजेच्छेनें ।।९।।
कराया सलगी । जरी येथें भ्यावें । तरी शांत व्हावें । मग कोठें ? ।।१०।।
ना तरी बालक । बोबडें चि बोले । टाकीत पाउलें । [६] साडींतिडीं ।।११।।
परी तयाचें हि । करोनि कौतुक । समाधान-सुख । पावे माता ।।१२।।
तेविं तुम्हां संत-। सज्जनांची प्रीति । लाभो आम्हांप्रति । कैसी तरी ।।१३।।
ही च एक [७] आस । मानसीं धरोन । लडिवाळपण । करूं आम्ही ।।१४।।
एऱ्हवीं सर्वज्ञ । तुम्ही संतजन । तेथें मी अजाण । काय बोलूं ! ।।१५।।
शारदा-पुत्रासी । विद्या मेळवाया । हवी का कराया । घोकंपट्टी ! ।।१६।।
काजवा तो देखा । असो किती मोठा । काय त्याचा ताठा । सूर्यापुढें ! ।।१७।।

---

१ लक्ष. २ गर्वानें. ३ लडिवाळपणाची. ४ लाड; हौशी. ५ मिळवूं. ६ वेडींवाकडीं. ७ इच्छा.

वाढावयाजोगीं । अमृताच्या ताटीं । पक्वानें कोणतीं । आणावीं हो ! ॥१८॥
स्वभावें शीतल । जयाचीं किरणें । तयासी [1] विंजणें । घडे केवीं ! ॥१९॥
कैसें ऐकवावें । नादासी गायन । घालावें भूषण । भूषणासी ! ॥२०॥
सांगा सुगंधानें । काय तें हुंगावें । सागरें नाहावें । कोणे ठायीं ! ॥२१॥
आघवें आकाश । घालील जी पोटीं । ऐसी वस्तु मोठी । दुजी कोठें ? ॥२२॥
तेविं होवोनियां । अवधानतृप्ति । पावोनियां चित्तीं । समाधान ॥२३॥
मुखें धन्योद्गार । काढाल आपण । ऐसें वक्तेपण । असे कोणा ! ॥२४॥
परी सर्व विश्वा । प्रकाशिता होय । ऐसा जो का सूर्य–। नारायण ॥२५॥
तया *काडवात । लावोनियां देखा । ओवाळूं नये का । भक्तिभावें ! ॥२६॥
किंवा ओंजळींत । घेवोनियां तोय । अर्पूं नये काय । सागरातें ! ॥२७॥
मानितों महेश । तुम्हां मूर्तिमंत । प्रभु श्रोते संत । सज्जन हो ॥२८॥
तुमचा मी भक्त । जरी शक्तिहीन । करितों पूजन । प्रेमभरें ॥२९॥
तरी बोलरूपी । *निर्गुंडी-त्रिदळ । स्वीकाराल बेल । मानोनियां ॥३०॥
बापाचिया ताटीं । बैसोनियां बाळ । त्यासी च [2] कवळ । देऊं लागे ॥३१॥
मग तो हि जैसा । प्रेमें संतोषून । आपुलें वदन । पुढें करी ॥३२॥
तैसा मी तों जरी । बालबुद्धि जड । करीं बडबड । तुम्हापांशीं ॥३३॥
तरी तेणें तुम्ही । पावाल संतोष । स्वभाव-विशेष । प्रेमाचा हा ॥३४॥
स्वीकारिलें मज । आपुला मानोनि । तुम्हीं संतजनीं । प्रेमभरें ॥३५॥
म्हणोनि माझिया । सलगीचें ओझें । वाटेना सहजें । तुम्हांलागीं ॥३६॥
मारीतसे ढुसी । वत्स पुन्हां पुन्हां । धेनु सोडी पान्हा । अधिक चि ॥३७॥
देखा संतजन । प्रियाचिया रोषें । प्रेम तें होतसे । [3] द्विगुणित ! ॥३८॥
मज लेंकराचें । ऐकोनि वक्तृत्व । [4] सुप्त कृपाळुत्व । तुमचें जें ॥३९॥
जाहलें तें जागें । ऐसें चि जाणोन । द्यावें अवधान । बोलिलों मी ॥४०॥
एऱ्हवीं आडींत । घालोनि का कोणी । पक्वदशा आणी । चांदिण्यातें ॥४१॥
नभा कैसी कोण । घाली [5] गवसणी । वाऱ्यासी का कोणी । गति देई ? ॥४२॥

---

*परिशिष्ट पहा.　१ वारा घालणें.　२ घांस.　३ दुप्पट.　४ झोंपलेलें.　५ खोळ; आवरण.

जळातें पातळ । न लगे करावें । न लगे [१] मंथावें । [२] नवनीत ॥४३॥
तेविं लाजोनियां । मागें वळे बोल । देखोनि सखोल । गीता-तत्त्व ॥४४॥
अहो वेद ते हि । जेथें मौनावले । निवांत झोंपले । जिये स्थानीं ॥४५॥
गीतार्थ तो कैसा । बोलूं मराठींत । अधिकार येथ । कोठें मज ॥४६॥
ऐसा हि मी परी । तीव्र इच्छा करीं । धरोनि अंतरीं । एक आशा ॥४७॥
करावें आपुलें । प्रेम संपादन । गीतार्थ सांगोन । धिटाईनें ॥४८॥
तरी चंद्राहून । स्वभावें शीतल । जें का [३] जीववील । [४] सुधेहून ॥४९॥
ऐसें अवधान । कृपेनें देवोन । मनोरथ पूर्ण । करा माझे ॥५०॥
तुमचिया कृपा–। दृष्टीचा वर्षाव । होतां सर्वथैव । मजवरी ॥५१॥
माझिया बुद्धींत । सर्वार्थाचें पीक । पिकेल निःशंक । पूर्णपणें ॥५२॥
परी ज्ञानांकुर । जाईल सुकोन । जरी उदासीन । तुम्ही येथें ॥५३॥
अवधानरूपी । जरी मिळे [५] खाजें । वक्तृत्व सहजें । पुष्ट होय ॥५४॥
आणि वक्त्याचिया । अक्षरांसी दोंदें । सुटती स्वच्छंदें । प्रमेयांचीं ॥५५॥
पहातसे अर्थ । बोलाची च वाट । अर्थीं प्रकटत । अभिप्राय ॥५६॥
मग अभिप्राय । ह्या परी अनेक । एकांतून एक । उपजती ॥५७॥
आणि भावरूप । फुलांचा बहर । येतसे साचार । बुद्धीवरी ॥५८॥
म्हणोनि संवाद–। रूपी अनुकूल । सर्वथा वाहेल । जरी वारा ॥५९॥
तरी *साहित्याचे । रसपूर्ण मेघ । वर्षतील चांग । अंतरंगीं ॥६०॥
आणि जरी श्रोते । [६] दुश्चित उदास । वितळेल रस । मांडला तो ॥६१॥
अहो *चंद्रकांत । द्रवे हें तों साच । परी चंद्राचें च । कौशल्य तें ॥६२॥
तैसें वक्त्याचें तें । वक्तृत्व कोठून । जरी सावधान । नसे श्रोता ॥६३॥
असो, आम्हां गोड । करोनियां खावें । कां हें विनवावें । तांदुळांनीं ॥६४॥
किंवा कळसूत्री । बाहुलीनें वायां । प्रार्थावें कासया । सूत्रधारा ॥६५॥
काय तिजसाठीं । नाचवी तियेला । वाढवी तो कला । आपुली च ॥६६॥
म्हणोनियां आम्हां । काय [७] प्रयोजन । द्यावें अवधान । म्हणावया ॥६७॥

---

*परिशिष्ट पहा. १ घुसळणें. २ लोणी. ३ जगवील. ४ अमृताहून. ५ खाद्य.
६ दुर्लक्ष करणारे. ७ गरज.

तंव ते श्रीगुरु । बोलती सहज । काय झालें तुज । ज्ञानदेवा ।।६८।।
प्रार्थिसी तें सर्व । पावलें आम्हांतें । आतां गीतार्थातें । प्रगटवीं ।।६९।।
देवें नारायणें । निरूपिलें सार । सांग तें सत्वर । श्रोतयांसी ।।७०।।
मग संतोषून । निवृत्तीचा दास । पावोनि उल्हास । म्हणे ऐसें ।।७१।।
आतां ऐका संत-। सज्जन हो तेथें । बोलिले पार्थातें । भगवंत ।।७२।।

श्रीभगवानुवाच-
इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ।
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ।।१।।

पार्था, पुन्हां तुज । सांगेन हें [1]बीज । अंतरींचें गुज । जीवाचिया ।।७३।।
ऐशा परी निज-। अंतरींची खूण । कां गा उकलून । दाखवावी ।।७४।।
तुज शंका ऐसी । येणें स्वाभाविक । तरी [2]सुज्ञा ऐक । सांगूं आतां ।।७५।।
करावें श्रवण । घ्यावें समजून । ऐसी आस्था पूर्ण । तुझे ठायीं ।।७६।।
आणि आम्ही जें जें । सांगूं तुज [2] सुज्ञा । तयाची [3]अवज्ञा । करिसी ना ।।७७।।
बोलूं नये तरी । बोलणें तें घडो । गूढपण मोडो । आमुचें गा ।।७८।।
परी आमुचिया । जीवींचें जें गुज । तयाची उमज । पडो तुज ।।७९।।
थानामाजीं तरी । असे दूध गूढ । परी नव्हे गोड । थानासी तें ।।८०।।
म्हणोनि लाभतां । अनन्य बालक । इच्छापूर्ति-सुख । मिळो तया ।।८१।।
ना तरी काढोन । बीज *मुड्यांतील । पेरिलें [4]चोखाळ । भूमीमाजीं ।।८२।।
तरी म्हणूं ये तें । काय धनंजया । सांडोनियां वायां । गेलें ऐसें ।।८३।।
ह्यालागीं [5]सुमन । आणि शुद्धमति । [6]अनन्य जे होती । अनिंदक ।।८४।।
गौप्य तरी तें हि । तयांप्रति सुखें । आपुलिया मुखें । सांगावें गा ।।८५।।
आतां गुणांनीं ह्या । अर्जुना संपन्न । नाहीं तुझ्याविण । दुजा कोणी ।।८६।।
म्हणोनियां गुज । तरी चोरोनियां । तुज पासोनियां । ठेवूं नये ।।८७।।
गूढ गूढ ऐसें । काय वाखाणून । होय आकलन । तुज कैसें ।।८८।।
*विज्ञानासहित । तरी आतां तुज । ज्ञान तें सहज । सांगेन मी ।।८९।।

---

*परिशिष्ट पहा. १ ज्ञान. २ जाणत्या. ३ अनादर. ४ मशागत केलेल्या.
५ शुद्ध मनाचे. ६ एकनिष्ठ.

भेसळलें जैसें । नाणें खरें खोटें । मग काढावें तें । पारखोनि ॥९०॥
किंवा चोंचीच्या च । चिमट्यानें जैसें । निवडावें हंसें । पय-पाणी ॥९१॥
तैसें पार्था, ज्ञान । आणिक विज्ञान । आतां विभागून । देऊं तुज ॥९२॥
पाहें पवनाच्या । धारेवरी चांग । [1] उफणितां मग । आपोआप ॥९३॥
दाणेयांची रास । खालतीं सांठोन । फोल तें उडोन । जाय जैसें ॥९४॥
तैसें जाणितां जें । प्रपंच-आभास । बांधोनि गांठीस । प्रपंचाच्या ॥९५॥
मोक्ष-सिंहासनीं । *मुमुक्षूलागोन । बैसवितें जाण । धनंजया ॥९६॥

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥२॥

जया ज्ञाना सर्व । विद्यांचिया गांवीं । आचार्य पदवी । गुरुत्वाची ॥९७॥
सर्व हि गुह्यांत । ज्ञान जें वरिष्ठ । पवित्रांत श्रेष्ठ । असे जें का ॥९८॥
धर्माचें निजधाम । तेविं सर्वोत्तम । नुरवी जें जन्म । आणि मृत्यु ॥९९॥
गुरु-मुखें अल्प । उगवतां दिसे । हृदयीं जें असे । स्वयंसिद्ध ॥१००॥
येई आपोआप । तयाचा प्रत्यय । गुरु-कृपा होय । जिये वेळीं ॥१०१॥
तेविं चढोनियां । सुखाची च वाट । घेतां येई भेट । ज्ञानाची ज्या ॥१०२॥
आणि ज्ञानाची ज्या । भेट होतां मग । भोग्य भोक्ता भोग । एक होती ॥१०३॥
परि भोगाचिया । ऐल सीमेवरी । चित्त उभें तरी । सुख पावे ॥१०४॥
असोनि जें ऐसें । सुलभ सुगम । वरी परब्रह्म–। पद देई ॥१०५॥
असे ह्याची एक । थोरवी आणिक । जाई ना जें देख । हातीं येतां ॥१०६॥
घेतां अनुभव । होई ना जें उणें । अविकारपणें । [2] अवीट जें ॥१०७॥
केविं लोकांचिया । उरलें हातोन । ज्ञान हें असोन । थोर भलें ॥१०८॥
ऐसी शंका येणें । तुज स्वाभाविक । होसी तूं तार्किक । धनंजया ॥१०९॥
जळतिये आगीं । घालिती जे उडी । व्हावी *चक्रवाढी । म्हणोनियां ॥११०॥
लोभिष्ट ते लोक । सोडितील कैसें । आत्म-सुख ऐसें । सुलभ्य जें ॥१११॥
पवित्र जें रम्य । [3] सुखोपायें गम्य । सर्वश्रेष्ठ [4] धर्म्य । पावन जें ॥११२॥

---

*परिशिष्ट पहा. १ वारविलें-पाखडलें-असतां. २ नित्य नवें. ३ सुखदायी मार्गाने मिळणारें. ४ शास्त्रोक्त.

आपुल्या चि ठायीं । आपणासी प्राप्त । अवीट शाश्वत । सर्वोत्तम ॥११३॥
ऐसें हें समस्त । आहे सुखमय । तरी लोक सोय । सांडिती कां ॥११४॥
येथें ऐसी शंका । घ्यावयासी जागा । असे, परी उगा । राहें पार्था ॥११५॥

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ।
अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि ॥३॥

जवळी च दूध । शुद्ध आणि गोड । पदराचे आड । त्वचेचिया ॥११६॥
परी तो गोचीड । तया अव्हेरून । रक्त चि पिऊन । राहे जैसा ॥११७॥
कमळाचा कंद । तळ्यामाजीं असे । तेथें चि तो वसे । बेडूक हि ॥११८॥
परी [1] मकरंद । सेवावा भ्रमरें । बेडकासी उरे । चिखल चि ॥११९॥
घरीं भूमीमाजीं । हंडे धन-पूर्ण । परी दैवहीन । नेणोनि तें ॥१२०॥
करी उपवास । तेथें चि बैसोन । कंठितो जीवन । [2] दीनवाणें ॥१२१॥
तैसा सकल हि । सुखांचा विश्राम । असतां मी [3] राम । अंतरांत ॥१२२॥
नेणोनियां मातें । विषयांच्या ठायीं । भुलोनियां जाई । मति-मंद ॥१२३॥
गिळितां थुंकावी । अमृताची चूळ । बहु मृगजळ । देखोनियां ॥१२४॥
तोडावा परीस । बांधिला जो गळां । शिंपला लाभला । म्हणोनियां ॥१२५॥
तैसीं तीं बापुडीं । न पावती मातें । * अहंममत्वातें । वेंगाटोनि ॥१२६॥
जन्म-मृत्यूचिया । मग दोन्ही तटीं । गटंगळ्या खाती । वारंवार ॥१२७॥
एऱ्हवीं मी तरी । प्रत्यक्ष समोर । जैसा का भास्कर । दृष्टीपुढें ॥१२८॥
परी उदयास्त । तया रात्रं-दिन । तें हि नाहीं न्यून । माझ्या ठायीं ॥१२९॥

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥४॥

माझा चि विस्तार । विश्व नोहे काय । दुधाचें चि होय । दहीं जैसें ॥१३०॥
ना तरी बीज चि । झालें वृक्षाकार । किंवा अलंकार । [4] भांगार चि ॥१३१॥
तैसें चराचर । माझा चि विस्तार । जाण गा साचार । धनंजया ॥१३२॥
[5] अव्यक्तत्वें होतें । थिजोनि राहिलें । तें चि पसरलें । विश्वाकारें ॥१३३॥

---

१ कमळांतील केसर, मध. २ रडवें; दरिद्री. ३ सुख देणारा; परमात्मा. ४ सोनें. ५ अव्यक्तपणे.

त्रैलोक्याच्या रूपें । ऐसा मी अमूर्त । आकारलों येथ । धनुर्धरा ॥१३४॥
आणि *महत्तत्त्वा–। पासोन साद्यन्त । जीं देहापर्यंत । सर्वभूतें ॥१३५॥
भासती तीं पार्था । माझ्या ठायीं जाण । जैसा भासे फेण । जळामाजीं ॥१३६॥
परी तया फेणा–। माजीं पाहूं जातां । दिसे ना सर्वथा । जळ जैसें ॥१३७॥
किंवा स्वप्नांतील । अनेकत्वाभास । न ये प्रत्ययास । जागृतींत ॥१३८॥
तैसा भूताभास । जरी माझ्या ठायीं । तरी मी तों नाहीं । तयांमाजीं ॥१३९॥
उपपत्ति ही च । अर्जुना, बरवी । सांगितली पूर्वीं । तुजलागीं ॥१४०॥
म्हणोनि जो बोल । बोलिला साचार । तयाचा विस्तार । नको आतां ॥१४१॥
परी पार्था, माझें । स्वरूप जें साच । राहूं दे तेथें च । दृष्टि तुझी ॥१४२॥

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥५॥

मायेचिया पैल । कडे माझें रूप । सांडोनि संकल्प । पाहूं जातां ॥१४३॥
तरी मजमाजीं । भूतें हें हि व्यर्थ । सर्व मी यथार्थ । म्हणोनियां ॥१४४॥
एऱ्हवीं संकल्प–। रूप सांजवेळे । [1]झांकोळती डोळे । बुद्धीचे हि ॥१४५॥
म्हणोनि मी जरी । असें अखंडित । तरी [2]झांजडींत । भिन्न भासें ॥१४६॥
जैसें शंका जातां–। क्षणीं च तें साचें । लोपतें माळेचें । सापपण ॥१४७॥
तैसी संकल्पाची । लोपतां ती सांज । अखंड सहज । स्व-रूपें मी ॥१४८॥
एऱ्हवीं भूमीच्या । आंतुनी स्वयंभ । निघती का कोंब । घडेयांचें ॥१४९॥
तयांची घडण । सर्वथा ती जाण । होय बुद्धींतून । [3]कुलालाच्या ॥१५०॥
ना तरी अर्जुना । सागराच्या आंत । खाणी का आहेत । तरंगांच्या ? ॥१५१॥
परी घडतां च । वाऱ्याचा [4]संसर्ग । सागरीं तरंग । नुठती का ? ॥१५२॥
पाहें धनंजया । कापसाच्या पोटीं । होती काय पेटी । कापडाची ? ॥१५३॥
परी वेढित्याच्या । दृष्टीनें तो जाण । साचार [5]वसन । नव्हे काय ? ॥१५४॥
घडविलें जरी । सुवर्ण-भूषण । तरी सोनेंपण । मोडे ना तें ॥१५५॥
परी वरिवरी । भूषणाचा भास । भासे तो [6]लेत्यास । साच वाटे ॥१५६॥

---

१ मिटले जातात. २ संधिप्रकाशांत; झांपडींत. ३ कुंभाराच्या. ४ संबंध. ५ वस्त्र.
६ धारण करणाराला.

१४

पाहें पडसाद । वाटे तरी साच । परी आपुला च । शब्द तो गा ॥१५७॥
पाहूं जातां जें जें । आरशांत भासे । तें तें रूप असे । आपुलें च ॥१५८॥
तैसें माझ्या शुद्ध । स्वरूपाचे ठायीं । कल्पोनि जो पाही । नाना भूतें ॥१५९॥
तयासी तयाच्या । संकल्पानुसार । भासतो साचार । भूताभास ॥१६०॥
मग मायेचा त्या । होवोनियां लोप । संकल्पाची झोंप । संपतां चि ॥१६१॥
सरे भूताभास । तो हि आपोआप । निर्मळ स्वरूप । उरे माझें ॥१६२॥
[1] निजांगीं भोंवळ । भरतां च मग । भोंवे सर्व जग । ऐसें भासे ॥१६३॥
तैसी आपुली च । कल्पना ती देख । अखंडीं अनेक । पहातसे ॥१६४॥
आतां कल्पना ती । सांडोनि तत्त्वतां । पाहूं जातां पार्था । रूप माझें ॥१६५॥
तरी मी भूतांत । भूतें माझ्या ठायीं । ऐसें स्वप्नांत हि । नये कल्पूं ॥१६६॥
भूतांचें [2] धारण । करीं एकला मी । राहें अंतर्यामीं । तयांचिया ॥१६७॥
जाहला [3] संकल्प–। सन्निपात जयां । ते चि ऐसें वायां । बोलती गा ॥१६८॥
म्हणोनियां ऐक । प्रियोत्तमा नीट । विश्वा हि सकट । विश्वात्मा मी ॥१६९॥
आणि जो हा मिथ्या । भूत-समुदाय । तयासी आश्रय । निरंतर ॥१७०॥
सूर्य-किरणांच्या । आधारें केवळ । मिथ्या मृगजळ । भासतसे ॥१७१॥
तैसें माझ्याठायीं । भासे भूतजात । मी तों अखंडित । ऐसें जाण ॥१७२॥
[4] मदाश्रयें ऐसे । होती प्राणीगण । परी नसें भिन्न । तयांहूनि ॥१७३॥
प्रभा आणि भानु । एक चि संपूर्ण । भूतांसी अभिन्न । असें तैसा ॥१७४॥
ऐश्वर्य-योग हा । आमुचा तत्त्वतां । कळला ना पार्था । तुजलागीं ? ॥१७५॥
भूत-भेदाचा तो । संबंध गा येथें । आतां उरे कोठें । सांगें मज ॥१७६॥
नको मानूं भूतें । माझ्याहूनि भिन्न । मी हि तयांहून । भिन्न नसें ॥१७७॥

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥६॥

पाहें पार्था, जैसें । जेवढें गगन । गगनीं पवन । तेवढा चि ॥१७८॥
हालविला तरी । भिन्न ऐसा भासे । एर्‍हवीं तो असे । गगन चि ॥१७९॥

---

१ स्वत:च्या अंगात. २ धरणें; सांभाळ. ३ कल्पनारूपी त्रिदोषाची बाधा. ४ माझ्या आधाराने.

तैसें भूतजात । माझ्या ठायीं साच । कल्पावें तरी च । आभासतें ॥१८०॥
* निर्विकल्पीं तरी । नाहीं भूतमात्र । आघवा सर्वत्र । मी च एक ॥१८१॥
कल्पनेच्या योगें । भूतांचें अस्तित्व । ना तरी अभाव । म्हणोनियां ॥१८२॥
कल्पनेच्या संगें । होतो भूताभास । जाय तो लयास । नि:संकल्पीं ॥१८३॥
* माया-योगें जीवा । लागला संकल्प । समूळ ती लोप । पावतां च ॥१८४॥
भूतांचें अस्तित्व । अथवा अभाव । व्यापार हा सर्व । मग कोठें ? ॥१८५॥
म्हणोनि ऐश्वर्य–। योग हा जो आहे । पुन: पुन्हां पाहें । तो चि एक ॥१८६॥
ऐशा प्रतीतीच्या । [1] बोधार्णवांतील । होईं तूं कल्लोळ । एक पार्था ॥१८७॥
स्थावर-जंगमीं । मग आपोआप । आपुलें चि रूप । पाहशील ॥१८८॥
मग देव म्हणे । पार्था, तुजप्रति । आली ना जागृति । ज्ञानाची ह्या ॥१८९॥
द्वैतस्वप्न मिथ्या । झालें किंवा नाहीं । सांग लवलाहीं । तरी आतां ॥१९०॥
कल्पनेची झोंप । पुन्हां कदाकाळीं । पार्था, जरी आली । बुद्धीलागीं ॥१९१॥
तरी भव-स्वप्नीं । जाशील गुंतोन । हारपोनि ज्ञान । अभेदाचें ॥१९२॥
म्हणोनि ही निद्रा । समूळ मोडेल । जागृति जोडेल । निरंतर ॥१९३॥
जेणें जीवा शुद्ध । ज्ञानरूपता च । ऐसें वर्म साच । दावूं आतां ॥१९४॥
तरी आतां लक्ष । देवोनियां ऐक । सांगेन जें एक । तुजलागीं ॥१९५॥
करी माया सर्व । भूतांसी निर्माण । संहार हि जाण । करी ती च ॥१९६॥

सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम् ।
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥७॥

प्रकृति हें नांव । जियेलागीं देती । [2] निवेदिली होती । मागें तुज ॥१९७॥
अष्टधा ती एक । जीवरूपा दुजी । ऐसी [3] द्विविध जी । होय पार्था ॥१९८॥
असो हें तों सर्व । तुजलागीं ठावें । न लगे सांगावें । पुन्हां तें च ॥१९९॥
कल्पक्षयीं लीन । होतें भूतजात । माझिया अव्यक्त । प्रकृतींत ॥२००॥
तीव्र उन्हाळ्यांत । भूमीमाजीं तृण । [4] सबीज सुलीन । होय जैसें ॥२०१॥
ना तरी [5] वर्षान्तीं । येतां शरत्काल । जैसें मेघ-जाल । नभीं आटे ॥२०२॥

---

१ ज्ञानरूप समुद्रातील. २ सांगितली. ३ दोन प्रकारची. ४ बीजासह. ५ पावसाळ्याच्या शेवटीं.

जळीं जैसी लाट । किंवा आकाशांत । पवन निवांत । लोपे जैसा ॥२०३॥
ना तरी मनींचें । मनीं लोपे स्वप्न । जागृति संपूर्ण । येतां जैसें ॥२०४॥
तैसें तें [१] प्राकृत । मिळे प्रकृतींत । अर्जुना, कल्पान्त । होय जेव्हां ॥२०५॥
मग कल्पारंभीं । मी च [२] सृजीं सृष्टि । ऐसें जें बोलती । जगामाजीं ॥२०६॥
त्या हि विषयींची । उपपत्ति साची । ऐक सव्यसाची । सांगेन मी ॥२०७॥

प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ।
भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥८॥

तंतूचा च नित्य–। संबंध म्हणोन । दिसे जैसी वीण । वस्त्रामाजीं ॥२०८॥
मग तियेचिया । आधारें तें जाण । भरे सान सान । चौकड्यांनीं ॥२०९॥
तेविं प्रकृतीचा । माझिया साचार । सहजें स्वीकार । करीं जेव्हां ॥२१०॥
तेव्हां प्रकृती च । नटे [३] पंचात्मक । आकार अनेक । घेवोनियां ॥२११॥
जैसें दुधालागीं । लागतां विरजण । स्वभावें आटोन । दहीं होय ॥२१२॥
तैसी प्रकृती च । सृष्टिपणाचिया । येई धनंजया । आकारातें ॥२१३॥
जळाचें सान्निध्य । लाभतां बीजातें । बीजाचें च होतें । झाड जैसें ॥२१४॥
तैसा मी केवळ । सृष्टीचें निमित्त । विस्तारते येथ । प्रकृती च ॥२१५॥
नगर हें रायें । वसविलें ऐसें । बोलती तें असे । जरी साच ॥२१६॥
तरी पाहूं जातां । खरोखरी तेथ । शिणले का हात । रायाचे त्या ? ॥२१७॥
स्वप्नामाजीं असे । तो चि प्रवेशत । जागृतावस्थेंत । मग जैसा ॥२१८॥
पाहें धनंजया । तैसा चि साचार । करीं मी स्वीकार । प्रकृतीचा ॥२१९॥
तरी स्वप्नांतून । येतां जागृतीस । पडे का [४] आयास । पायांलागीं ॥२२०॥
किंवा स्वप्नामाजीं । असतां तयास । घडे का प्रवास । सांगें मज ॥२२१॥
भूतसृष्टीचें ह्या । कर्तृत्व तें देख । नसे कांहीं एक । मजकडे ॥२२२॥
हा चि अभिप्राय । सर्वथा यथार्थ । धनंजया येथ । ध्यानीं घेईं ॥२२३॥
राजाश्रयें जैसी । प्रजा ती साचार । आपुले व्यापार । करितसे ॥२२४॥
तैसी [४] मदाधारें । प्रकृति च जाण । सर्वथा निर्माण । करी विश्व ॥२२५॥

---

१ प्रकृति (माये) पासून उत्पन्न झालेलें.　२ निर्माण करतों.　३ पंचमहाभूतात्मक.　४ माझ्या आश्रयानें.

पौर्णिमेचा चंद्र । भेटतां साचार । भरती अपार । सागरीं ये ।।२२६।।
परी तेथें काय । पडती चंद्रास । अल्प हि सायास । सांगें मज ।।२२७।।
लोह-चुंबकाच्या । सान्निध्यांत पाहें । [१] लोह चळताहे । जड जरी ।।२२८।।
तरी त्या लोहासी । [२] कराया [२] आकृष्ट । पडती का कष्ट । चुंबकासी ।।२२९।।
काय सांगूं फार । ह्या परी साचार । करीं मी स्वीकार । प्रकृतीचा ।।२३०।।
आणि एकाएकीं । मग ती प्रकृति । लागे भूतसृष्टि । प्रसवाया ।।२३१।।
वेल-पल्लवांना । कराया उत्पन्न । समर्थ ती जाण । भूमि जैसी ।।२३२।।
तेविं धनंजया । सर्व प्राणीगण । सर्वथा आधीन । प्रकृतीच्या ।।२३३।।
बाळपणादिक । अवस्थांसी देख । आधार तो एक । देह-संग ।।२३४।।
किंवा उद्भवाया । नभीं मेघ-माला । आधार एकला । वर्षाकाल ।।२३५।।
ना तरी स्वप्नासी । निद्रा चि कारण । धनुर्धरा जाण । होय जैसी ।।२३६।।
तैसी अखिल हि । भूत-समुद्राची । स्वामिनी ती साची । प्रकृति च ।।२३७।।
स्थावर जंगम । सूक्ष्म किंवा स्थूळ । जगासी तों मूळ । प्रकृति च ।।२३८।।
म्हणोनि भूतांची । करावी उत्पत्ति । किंवा तयांप्रति । सांभाळावें ।।२३९।।
इत्यादिक सर्व । कृतींचें कर्तृत्व । न ये सर्वथैव । मजकडे ।।२४०।।
चांदण्याच्या वेली । पसरल्या जळीं । वाढ नाहीं केली । चंद्रानें ती ।।२४१।।
तैसीं सर्व कर्में । जाण धनंजया । मजपासोनियां । दूर ठेलीं ।।२४२।।

न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनंजय ।
उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ।।९।।

अडवील कैसा । [३] सैंधवाचा घाट । सिंधु-जळ-लोट । सुटतां चि ।।२४३।।
तैसा मी शेवट । सर्व हि कर्मांतें । मग का तीं मातें । बांधितील ? ।।२४४।।
काय सांगें [४] धूम्र-। कणांची पिंजरी । [५] प्रतिरोध करी । [६] झंझावाता ।।२४५।।
ना तरी अंधार । प्रवेशेल काय । सांग बरें सूर्य-। बिंबामाजीं ।।२४६।।
पर्जन्याच्या धारा । पर्वताच्या पोटीं । जैशा न खोंचती । धनुर्धरा ।।२४७।।
तैसें कर्मजात । प्रकृतीचें देख । न होय बंधक । मजलागीं ।।२४८।।

---

१ लोखंडी.   २ ओढून घ्यायला.   ३ मिठाचा बंधारा.   ४ धुराचा पिंजरा.   ५ अडवतो.   ६ वावटळीला.

एऱ्हवीं ह्या विश्वा–। माजीं सव्यसाची । अवधारीं मी चि । एक असें ।।२४९।।
परी विश्वीं राहें । उदासीनापरी । करवीं ना करीं । कांहीं एक ।।२५०।।
घाली ना नियम । किंवा [१] निवारी ना । गृहामाजीं कोणा । दीप जैसा ।।२५१।।
आणि कोण कैसा । करी व्यवहार । हें हि तो साचार । नेणे कांहीं ।।२५२।।
गृहींचे व्यापार । चालावया जाण । जैसा तो कारण । साक्षीभूत ।।२५३।।
भूतांचिया ठायीं । तैसा मी असोन । राहें उदासीन । भूतकर्मीं ।।२५४।।
असो बहुत हे । करोनि [२] पर्याय । पुन: पुन्हां काय । सांगूं तुज ।।२५५।।
येथें एक चि हा । अभिप्राय भला । घेईं एक वेळां । ध्यानामाजीं ।।२५६।।

मयाऽध्यक्षेण प्रकृति: सूयते सचराचरम् ।
हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते ।।१०।।

लोक-व्यवहार । चालाया सकळ । निमित्त केवळ । सूर्य जैसा ।।२५७।।
तैसा सृष्टीचिया । उत्पत्तीसी जाण । असें मी कारण । पंडुसुता ।।२५८।।
निज-प्रकृतीचा । करितां स्वीकार । सृष्टि चराचर । पावे जन्म ।।२५९।।
म्हणोनियां [३] हेतु । होय मी सृष्टीसी । उपपत्ति ऐसी । जुळतसे ।।२६०।।
धनंजया सर्व । भूतें माझ्या ठायीं । परी मी तों नाहीं । भूतांमाजीं ।।२६१।।
धरोनि ही ज्ञान–। प्रकाशाची सोय । पाहें हा ऐश्वर्य–। योग माझा ।।२६२।।
किंवा माझ्या ठायीं । नाहींत भूतें हि । आणि मी हि नाहीं । भूतांमाजीं ।।२६३।।
स्वरूप-बोधाची । ऐसी च ही खूण । न हो विस्मरण । तियेचें गा ।।२६४।।
अर्जुना, सर्वस्व । आमुचें हें गूढ । दाविलें उघड । परी तुज ।।२६५।।
आतां अंतरीं च । भोगीं आत्मसुख । [४] वृत्ति अंतर्मुख । करोनियां ।।२६६।।
नये ज्ञान-वर्म । जोंवरी हें हाता । तोंवरी सर्वथा । पंडुसुता ।।२६७।।
सत्य-स्वरूपाचें । घडे ना दर्शन । जेविं [५] तुषीं कण । सांपडे ना ।।२६८।।
एऱ्हवीं तें वाटे । तर्काचिया बळें । जणूं आकळलें । यथार्थत्वें ।।२६९।।
परी सांगें मृग–। जळाचें जें ओल । तयानें भिजेल । काय भूमि ? ।।२७०।।
जळामाजीं जैसें । पसरितां जाळें । [६] जाळीं सांपडलें । चंद्र-बिंब ।।२७१।।

---

१ नको म्हणत नाही. २ प्रकार. ३ कारण. ४ मन:स्थिति. ५ कोंड्यात; भुश्यांत. ६ जाळ्यांत.

परी तें तीरासी । काढोनि झाडितां । बिंब काय हाता । लागे तेथें ॥२७२॥
तैसे वाचाबळें । [1]प्रतीतीचा डौल । दाविती जे फोल । शब्द-ज्ञानी ॥२७३॥
तयांलागीं सत्य । ज्ञान तें तों नाहीं । होईल ऐसें हि । घडे केविं ॥२७४॥

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।
परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥११॥

काय सांगूं फार । भिवोनि [2]भवासी । अंतरीं इच्छिसी । माझी प्राप्ति ॥२७५॥
तरी तुज खूण । दिली दाखवून । करीं ती जतन । सोऽहंभावें ॥२७६॥
जैसें कोणी बोले । चांदणें पिवळें । बिघडतां डोळे । *काविळीनें ॥२७७॥
तैसे माझ्या शुद्ध । स्वरूपाचे ठायीं । देखती ते पाहीं । नाना दोष ॥२७८॥
किंवा कोणी ज्वरें । बिघडतां मुख । म्हणे कडू [3]विख । दुधातें हि ॥२७९॥
तैसे लेखिती ते । मज देहयुक्त । देहधर्मातीत । असतां मी ॥२८०॥
म्हणोनियां तुज । सांगें वारंवार । न पडो विसर । खुणेचा ह्या ॥२८१॥
नाहीं तरी स्थूल-। दृष्टि स्वीकारितां । पाहणें तें पार्था । जाय वायां ॥२८२॥
स्थूल-दृष्टीनें जे । पाहूं जाती मातें । न दिसें तयांतें । यथार्थत्वें ॥२८३॥
जैसें स्वप्नामाजीं । पिवोनि अमृत । नाहीं कोणी होत । चिरंजीव ॥२८४॥
आतां मातें दृढ । जाणिलें म्हणोनि । बोलती जे कोणी । स्थूलदृष्टि ॥२८५॥
तयां मूढांचें तें । ज्ञान चि अर्जुना । जाण सत्य-ज्ञाना-। आड ठाके ॥२८६॥
जळीं नक्षत्रांचा । जाहला आभास । मानोनि तयांस । हिरेमोतीं ॥२८७॥
जैसा हंसें केला । आपुला चि घात । लोभें उदकांत । शिरोनियां ॥२८८॥
[4]जान्हवी म्हणोन । मृग-जळापाशीं । ठाकतां कोणासी । काय लाभ ?॥२८९॥
सांगें कल्प-वृक्ष । म्हणोनि बाभूळ । पूजितां निष्फळ । नव्हे का तें ?॥२९०॥
सर्पालागीं रत्न-। हार [5]दुपदरी । मानोनियां करीं । घेऊं धांवे ॥२९१॥
किंवा जैसा कोणी । गारगोट्या वेंची । [6]पंक्ति हिरेयांची । समजोनि ॥२९२॥
ना तरी निधान । लाधलें म्हणोन । निखारे बांधोन । घेई [7]खोळीं ॥२९३॥
किंवा कूपीं सिंह । जेविं उडी घाली । नेणोनि साउली । आपुली च ॥२९४॥

---

१ अनुभवाची ऐट.   २ संसाराला.   ३ विष.   ४ गंगा.   ५ दोन पदर असलेला.   ६ रांग.   ७ पदरांत.

तेविं प्रपंचांत । पाहूं जाती मातें । ठेवोनियां तेथें । दृढबुद्धि ।।२९५।।
तयांनीं चंद्रासी । धरावयासाठीं । बिंबा दिली मिठी । जळांतील ।।२९६।।
आणि तयांचा तो । निश्चय हि वायां । गेला धनंजया । जाण ऐसें ।।२९७।।
पिवोनियां [1] कांजी । मग अमृताचा । परिणाम साचा । पाहूं जावें ।।२९८।।
तैसें नाशिवंत । स्थूलाकारीं तेथें । भरंवसा चित्तें । बांधोनियां ।।२९९।।
मज अव्ययातें । पहावया जाती । तयां माझी प्राप्ति । कैसी होय ।।३००।।
पूर्वेचिया वाटे । निघोनि साचार । पश्चिम-सागर । भेटे काय ? ।।३०१।।
किंवा कोंडेयाचें । करोनि कांडण । लाभेल कोठोन । दाणा तेथें ? ।।३०२।।
तैसें पंचमहा-। भूतांचें सकळ । विकारलें स्थूळ । विश्व जें हें ।।३०३।।
तयाचिया ज्ञानें । स्वरूप निर्मळ । कैसें आकळेल । सांग माझें ।।३०४।।
काय धनंजया । पिवोनियां [2] फेन । उदक-प्राशन । केलें होय ? ।।३०५।।
भ्रांतमनोधर्में । होवोनि मोहित । मज प्रपंचांत । पाहती ते ।।३०६।।
मग जन्म-मृत्यु । इत्यादिक स्थिति । त्या हि मजप्रति । भाविती ते ।।३०७।।
मज अनाम्यातें । ठेविती ते नाम । अक्रियासी कर्म । आरोपिती ।।३०८।।
मानिती ते मज । देहधर्मयुक्त । देहाविरहित । ऐसा जो मी ।।३०९।।
उपाधिरहिता । मज उपचार । कल्पिती आकार । निराकारा ।।३१०।।
विधि- [3] विवर्जिता । मज व्यवहार । लाविती साचार । आचारादि ।।३११।।
वर्णहीना वर्ण । गुणातीता गुण । आणिक चरण । अचरणा ।।३१२।।
अहस्तातें मज । हस्त हि कल्पिती । मापाया पाहती । अमापातें ।।३१३।।
आणि सर्वांठायीं । असोनि हि जाण । कल्पिती ते स्थान । मज एक ।।३१४।।
निद्रितासी जैसें । पडोनियां स्वप्न । दिसे उपवन । शेजेमाजीं ।।३१५।।
तैसें आवडे तें । देती मज रूप । स्वभावें अरूप । असोनि मी ।।३१६।।
अकर्णातें कर्ण । अचक्षूसी नेत्र । *अगोत्रातें गोत्र । कल्पिती ते ।।३१७।।
अव्यक्तासी व्यक्ति । अनार्तासी आर्ति । स्वयंतृप्ता तृप्ति । भाविती गा ।।३१८।।
[4]अनावरणातें । मज प्रावरण । योजिती भूषण । अभूषणा ।।३१९।।

---

१ पेज. २ फेस. ३ नियमांच्या पलीकडे असलेल्याला. ४ जो वस्त्रांत गुंडाळितां येत नाही अशा मला.

आदिकारणातें । देखती कारण । घडविती जाण । सहजातें ।।३२०।।
असोनि मी नित्य । माझें *आवाहन । आणि *विसर्जन । करिती ते ।।३२१।।
करिती ते *प्राण–। प्रतिष्ठा माझी च । असोनि मी साच । स्वयंसिद्ध ।।३२२।।
असोनि मी नित्य । एक स्वयंसिद्ध । [1]बाल्यादि संबंध । मानिती ते ।।३२३।।
मज अद्वैतातें । आणिती द्वैतांत । घालिती कर्मांत । कर्मातीता ।।३२४।।
भोगितों मी भोग । ऐसें पंडुसुता । असोनि अभोक्ता । बोलती ते ।।३२५।।
मज अकुळाचें । वर्णिती ते कुळ । विसरोनि मूळ । स्वरूपातें ।।३२६।।
मज शाश्वताचें । कल्पोनि निधन । दु:खें आक्रंदन । करिती ते ।।३२७।।
[2]सर्वांतरा मज । वैर-मित्रत्वादि । विविध उपाधि । कल्पिती गा ।।३२८।।
नित्य निजानंदीं । निरंतर जाण । पूर्ण रममाण । असें जो मी ।।३२९।।
तया मज नाना । सुखांची कामना । ऐसी च भावना । करिती ते ।।३३०।।
सर्वांठायीं माझी । सारखी च व्याप्ति । असोनि म्हणती । एकदेशी ।।३३१।।
कोपोनियां एका । मारीतसें ठार । घेतसें कैवार । आणिकाचा ।।३३२।।
चराचरीं आत्मा । असोनि मी एक । ऐसें चि ते देख । [3]रूढविती ।।३३३।।
काय सांगूं फार । धनंजया येथ । धर्म जे प्राकृत । मानवाचे ।।३३४।।
ते चि माझ्या ठायीं । कल्पिती समस्त । ऐसें विपरीत । ज्ञान त्यांचें ।।३३५।।
घडवूनि मूर्ति । ठेविती ती पुढें । करिती बापुडे । भक्ति माझी ।।३३६।।
भंगतां ती मग । गेलें देवपण । ऐसें समजोन । टाकिती ते ।।३३७।।
ऐशापरी पार्था । मानवी आकार । देती ते साचार । मजलागीं ।।३३८।।
म्हणोनि तयांचें । ज्ञान चि तें जाण । टाकितें झांकोन । सत्य ज्ञाना ।।३३९।।

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतस: ।
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिता: ।।१२।।

धनंजया येथें । काय ते जन्मून । वर्षाकाळावीण । मेघ जैसे ।।३४०।।
किंवा जैशा मृग–। जळाच्या लहरी । पहाव्या त्या तरी । दुरूनि च ।।३४१।।
ना तरी जादूचे । जैसे अलंकार । किंवा घोडेस्वार । मृत्तिकेचे ।।३४२।।

---

*परिशिष्ट पहा. १ बाळपण; तारुण्य वगैरे. २ सर्वांच्या अंत:करणात राहणाऱ्याला. ३ प्रसिद्ध करतात.

ना तरी गंधर्व–। नगरीचें जैसें । आकाशीं आभासे । [१] गांवकूस ॥३४३॥
साबरीचीं झाडें । वाढलीं सरळ । फळ ना पोकळ । आंतुनि हि ॥३४४॥
किंवा शेळियेचे । गळां जैसे स्तन । होती दुग्धावीण । निरर्थक ॥३४५॥
शेवरीसी जैसीं । फळें आलीं वायां । द्यावया घ्यावया । येती ना तीं ॥३४६॥
तैसें चि तें तयां । मूढांचें जीवन । निरर्थक जाण । धनंजया ॥३४७॥
आणि तयांचा जो । कर्म-व्यवहार । सर्वथा [२] धि:कार । असो त्याचा ॥३४८॥
आंधळ्यासी जैसें । सांपडावें मोतीं । मर्कटाचे हातीं । [३] नारिकेल ॥३४९॥
तैसें अध्ययन । तयांनीं जें केलें । वायां चि तें गेलें । ऐसें जाण ॥३५०॥
काय सांगूं फार । तयांचीं तीं शास्त्रें । जैसीं हातीं शस्त्रें । बालिकेच्या ॥३५१॥
तैसें ज्ञान आणि । कर्म हि तें वायां । जाहलें गा तयां । निर्बुद्धांचें ॥३५२॥
तमोगुणरूपी । राक्षसी ती जाण । टाकी जी गिळोन । सद्बुद्धीतें ॥३५३॥
आणि विवेकाचा । [४] उरूं नेदी ठाव । हिंडे जी सदैव । अविद्येंत ॥३५४॥
त्या चि प्रकृतीच्या । जाहले स्वाधीन । सर्वथा होवोन । भ्रांत-चित्त ॥३५५॥
हिंसारूपी जीभ । जियेच्या मुखांत । लोळते लाळेंत । आशेचिया ॥३५६॥
आणि संतोषाचे । घेवोनि चघळ । बैसे सर्वकाळ । चघळीत ॥३५७॥
निघोनि बाहेरी । श्रवणापर्यंत । दीर्घ ओष्ठप्रांत । चाटीतसे ॥३५८॥
ऐसी जी [५] प्रमाद–। पर्वताची दरी । प्रकृति आसुरी । मत्त सदा ॥३५९॥
जियेचिया मुखीं । द्वेषाचिया दाढा । करिती चुराडा । प्रबोधाचा ॥३६०॥
* अगस्तीसी जैसें । कुंभ-प्रावरण । तैसी जी झांकोन । टाकी मूढां ॥३६१॥
त्या चि प्रकृतीच्या । मुखामाजीं जाण । पडले होवोन । भूत-बळी ॥३६२॥
भ्रांतीचिया कुंडीं । बुडोनि ते गेले । खांचीं अडकले । अज्ञानाच्या ॥३६३॥
विचाराचा हात । लाभे ना तयांस । नुरे मागमोस । तयांचा गा ॥३६४॥
तरी वृथा बोल । असोत हे आतां । कासयासी कथा । [६] विमूढांची ? ॥३६५॥
विस्तारें तयांचें । करोनि वर्णन । कां गा द्यावा शीण । वाचेलागीं ॥३६६॥
ऐकोनि हें ऐसें । देवाचें भाषण । अर्जुनें हि मान । डोलविली ॥३६७॥

---

* परिशिष्ट पहा. १ गांवासभोवतालचा तट. २ निषेध. ३ नारळ. ४ राहूं देत नाही. ५ दोष. ६ मूर्खाची.

मग देव म्हणे । ऐक संतगोष्टी । वाचेसि विश्रांति । मिळे जेथें ।।३६८।।

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।
भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ।।१३।।

[१] क्षेत्र-संन्यासी मी । होवोनि रहात । शुद्ध मानसांत । जयांचिया ।।३६९।।
जयांलागीं पाहें । निद्रेंत हि कैसें । पार्था, सेवितसे । वैराग्य तें ।।३७०।।
आणि जयांचिया । वासनेमाझारीं । धर्म राज्य करी । निरंतर ।।३७१।।
ऐशापरी आस्था । आणिक सद्भाव । विवेकी स्वभाव । जयांचा गा ।।३७२।।
ज्ञानगंगेमाजीं । करोनियां स्नान । सर्वथा पावन । जाहले जे ।।३७३।।
जयांचिया रूपें । पालवली शांति । पावले जे तृप्ति । पूर्णतेनें ।।३७४।।
जे का धैर्यरूप । मंडपाचे खांब । निघाले कीं कोंब । ब्रह्मालागीं ।।३७५।।
ब्रह्मानंदरूपी । सागरीं तुडुंब । बुडवोनि [२] कुंभ । काढिले जे ।।३७६।।
नित्य भक्तिसुखीं । होवोनि तल्लीन । लेखिती जे हीन । मुक्तीतें हि ।।३७७।।
आणि जयांचिया । सहज-कर्मांत । राहिली जिवंत । दिसे नीति ।।३७८।।
सर्वेंद्रियांठायीं । अर्जुना, जयांनीं । चढविलीं लेणीं । शांतिरूप ।।३७९।।
सर्वकाळ मज । सर्वव्यापकातें । व्यापोनि रहातें । चित्त ज्यांचें ।।३८०।।
धनंजया, ऐसे । [३] महंत जे साचे । दैवी प्रकृतीचें । भाग्य जे का ।।३८१।।
चढत्या वाढत्या । प्रेमें सर्वकाळ । जाणोनि सकळ । मद्रूप चि ।।३८२।।
महात्मे ते माझें । करिती भजन । परी दुजेपण । सांडोनियां ।।३८३।।
सेविती ते मातें । होवोनियां मी च । कौतुक तें साच । ऐक आतां ।।३८४।।

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः ।
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ।।१४।।

* प्रायश्चितांचें तों । संपलें चि काम । ऐसें चाले नाम–। संकीर्तन ।।३८५।।
नामसंकीर्तनीं । नाचतां रंगोन । पातकें जळोन । गेलीं सारीं ।।३८६।।
तीर्थांचें माहात्म्य । लोपलें सहज । जाहले निस्तेज । यम-दम ।।३८७।।
यमलोकांतील । सर्व हि [४] व्यापार । खुंटला साचार । आपोआप ।।३८८।।

---

१ (संन्यास घेऊन) एकाच क्षेत्रांत कायम राहणारा.　२ घडे; घागरी.　३ महात्मे.　४ व्यवहार.

यम म्हणे आतां । काय नियमावें । कोणा आवरावें । म्हणे दम ।।३८९।।
काय खावें दोष । नाहीं राहिला च । बोलती ऐसें च । सर्व तीर्थें ।।३९०।।
करिती ते सर्व । दु:ख परिहार । माझिया साचार । नाम-घोषें ।।३९१।।
अवघें चि जग । मग दुमदुमोन । टाकिती भरोन । महा-सुखें ।।३९२।।
न होतां पहाट । देती जे प्रकाश । न देतां [1] पीयूष । वांचविती ।।३९३।।
नाचरितां योग । अष्टांग-साधन । [2] कैवल्य-दर्शन । घडविती ।।३९४।।
राजा-रंक ऐसा । मानिती ना भेद । ठेविती संबंध । सारिखा च ।।३९५।।
कैसे सान-थोरां । सर्वांसी साचार । होती ते माहेर । आनंदाचें ।।३९६।।
गांठी एखादा च । वैकुंठाची पेठ । अवघें वैकुंठ । केलें ह्यांनीं ।।३९७।।
नामघोषाचिया । गौरवें संपूर्ण । विश्व चि पावन । केलें ऐसें ।।३९८।।
पाहें धनंजया । सूर्यासारखी च । तेजस्विता साच । ह्यांचे ठायीं ।।३९९।।
परी सूर्य तो हि । मावळे हा दोष । अखंड प्रकाश । असे ह्यांचा ।।४००।।
[3] मासान्तरीं चंद्र । एकदां संपूर्ण । हे तों परिपूर्ण । निरंतर ।।४०१।।
मेघ ते उदार । परी ओसरती । अपुरे पडती । उपमेसी ।।४०२।।
ऐशा महात्म्यांतें । कृपापूर्ण सिंह । ऐसें नि:संदेह । म्हणूं ये गा ।।४०३।।
शतावधि जन्म । उपासितां मातें । एक वेळ येतें । हातासी जें ।।४०४।।
ऐसें माझें नाम । जयांचिये वाचे–। पुढें नित्य नाचे । प्रेमभरें ।।४०५।।
तो मी एकवेळ । नसें वैकुंठांत । नाहीं सांपडत । * भानु-बिंबीं ।।४०६।।
वरी एकवेळ । योग्यांचें हि मन । जाईं उल्लंघून । पलीकडें ।।४०७।।
परी जे का माझा । अखंड बरवा । करिती पांडवा । नाम-घोष ।।४०८।।
हारपतां मज । शोधावें तेथें च । तयांपाशीं साच । सांपडें मी ।।४०९।।
माझे गुण गातां । कैसे तृप्त झाले । पाहूं विसरले । देश-काळ ।।४१०।।
नाम-संकीर्तनीं । होवोनि तल्लीन । सुखावले पूर्ण । स्वरूपीं च ।।४११।।
कृष्ण विष्णु हरि । गोविंद हीं नामें । गर्जोनियां प्रेमें । वारंवार ।।४१२।।
नामसंकीर्तना–। माझारीं उदंड । करिती उघड । [4] आत्मचर्चा ।।४१३।।

---

*परिशिष्ट पहा. १ अमृत. २ मोक्ष (ब्रह्मतत्त्व) दर्शन. ३ महिन्यानें. ४ आत्मस्वरूपाविषयी निरूपण.

असो हा विस्तार । धनुर्धरा ऐक । ह्यापरी कित्येक । भक्त माझे ।।४१४।।
मज निर्गुणाचे । गुण गात गात । हिंडती जगांत । आवडीनें ।।४१५।।
आणिक ते आतां । ऐक पंडुसुता । स्वभावें दक्षता । ठेविती जे ।।४१६।।
पंचप्राण आणि । मन हे सांगाती । मार्ग दाखविती । जयांलागीं ।।४१७।।
*यम-नियमांचें । कांटेरी कुंपण । बाहेरी लावोन । सभोंवतीं ।।४१८।।
आंत *मूळबंध-। रूपी [1] कोट भला । जयांनीं रचिला । बळकट ।।४१९।।
तयावरी मग । *प्राणायामरूप । कार्यकर्ती तोफ । चढविली ।।४२०।।
तेणें ऊर्ध्वमुख । होतां *कुंडलिनी । प्रकाश लक्षूनि । नीट तिचा ।।४२१।।
मन-पवन-बळें । *सत्रावीचें तळें । हस्तगत केलें । एकाएकीं ।।४२२।।
पहा तेथें कैसा । *प्रत्याहारें मग । पराक्रम चांग । गाजविला ।।४२३।।
[2] विकारमात्राची । लावोनियां वाट । वळविलीं आंत । सर्वेंद्रियें ।।४२४।।
*धारणा-तुरंगीं । दाटोनियां तेथ । केलीं एकत्रित । महा-भूतें ।।४२५।।
मग संकल्पाचें । *चतुरंग दळ । सकळ समूळ । नष्ट केलें ।।४२६।।
तंव 'जय झाला' । ऐसें पुकारीत । ध्यानाची नौबत । झडूं लागे ।।४२७।।
तन्मयावस्थेचें । एकछत्र कैसें । तिये वेळीं दिसे । झळाळत ।।४२८।।
[3] समाधिश्रियेचें । [4] स्वानुभूतिमय । अखंड जें होय । राज्यसुख ।।४२९।।
[5] पट्टाभिषेक तो । सुखाचा त्या भला । तयांलागीं झाला । सामरस्यें ।।४३०।।
अर्जुना, गहन । माझें हें भजन । आणिक सांगेन । ऐक आतां ।।४३१।।
वस्त्रांमाजीं दोन्ही । पालवांपर्यंत । असे ओतप्रोत । एक तंतु ।।४३२।।
तैसा चराचरीं । मीच असें एक । ऐसें चि व्यापक । ज्ञान ज्यांचें ।।४३३।।
ब्रह्म्यापासोनियां । कीटकापर्यंत । जाणोनि समस्त । रूप माझें ।।४३४।।
मग सान थोर । ऐसा भेदभाव । सजीव निर्जीव । नेणोनियां ।।४३५।।
देखिल्या वस्तूसी । मी च ती म्हणोन । उजू लोटांगण । घालिती ते ।।४३६।।
आपुलें महत्त्व । तरी विसरोन । पुढील नेणोन । योग्यायोग्य ।।४३७।।
भेटे जी जी व्यक्ति । तियेचिया पायां । पडावें हें तयां । आवडे गा ।।४३८।।

---

१ किल्ला; तट.　२ प्रत्येक विकाराची.　३ समाधीच्या वैभवाचें.　४ आत्मानुवानें भरलेलें.　५ राज्याभिषेक.

उंच स्थानाहून । पडलें जें जळ । गांठीतसे तळ । आपोआप ॥४३९॥
तैसें भूतजात । नमावें लवोन । स्वभाव चि जाण । तयांचा हा ॥४४०॥
फळभारें जैसी । वृक्षाची डहाळी । ओथंबते खालीं । सहजें चि ॥४४१॥
तैसे जीवांपुढें । होवोनियां [१] लीन । तयांसी वंदन । करिती ते ॥४४२॥
नम्रपणा ही च । तयांची संपत्ति । गर्वहीन स्थिति । अखंडित ॥४४३॥
आणि जयमंत्रें । सर्व हि तें धन । समर्पिती जाण । माझ्याठायीं ॥४४४॥
गळोनियां गेले । मान-अपमान । होतां चि नमन । ऐशापरी ॥४४५॥
म्हणोनियां पाहें । जाहले मद्रूप । कैसे आपोआप । एकाएकीं ॥४४६॥
ऐसे एकरूप । होवोनि साचार । मज निरंतर । उपासिती ॥४४७॥
अर्जुना, ही ऐसी । माझी थोर भक्ति । येथें तुजप्रति । निवेदिली ॥४४८॥
आतां अवधारीं । आणिक भक्तांतें । यजिती जे मातें । ज्ञान-यज्ञें ॥४४९॥
तयांची ती रीति । तुज असे ठावी । वर्णिली जी पूर्वीं । प्रसंगें चि ॥४५०॥
तंव पार्थ म्हणे । तुझ्या कृपेनें च । जाणतसें साच । सर्व हि तें ॥४५१॥
परी अमृताचें । वाढितां जेवण । म्हणेल का कोण । पुरे ऐसें ? ॥४५२॥
ऐकोनि हे बोल । देवें ओळखिलें । ज्ञानीं [२] लगटलें । चित्त ह्याचें ॥४५३॥
संतोषून मग । लागे डोलावया । पुन्हां बोलावया । [३] सरसावे ॥४५४॥
म्हणे भलें केलें । तुवां पंडुसुता । एऱ्हवीं सर्वथा । [४] अवेळ हा ॥४५५॥
परी ज्ञानाठायीं । आस्था असे तुज । बोलविते मज । ती च येथें ॥४५६॥
तों चि पार्थ बोले । भक्त-प्रियकरा । चांदणें *चकोरा-। साठीं च का ॥४५७॥
चांदण्याचा तरी । ऐसा चि स्वभाव । चराचर सर्व । शांतवावें ॥४५८॥
करिती चकोर । चंद्राकडे चोंच । तृप्ति आपुली च । करावया ॥४५९॥
तैसी आमुची ती । विनवणी किती । देव कृपामूर्ति । स्वभावें चि ॥४६०॥
करी मेघराज । जयालागीं तृप्त । तेथें काय [५] आर्त । *चातकाचें ! ॥४६१॥
परी चूळभरी । गंगोदकासाठीं । गंगेची च भेटी । घ्यावी लागे ॥४६२॥
तैसें असो आर्त । थोडें कीं बहुत । सांगावें समस्त । देवासी च ॥४६३॥

---

*परिशिष्ट पहा. १ नम्र. २ चिकटलें. ३ पुढें झाला. ४ अयोग्य काळ. ५ उत्कट इच्छा.

तंव म्हणे देव । स्वस्थ राहें पार्था । पाहोनियां आस्था । संतोषलों ॥४६४॥
तयावरी आतां । साहवेल स्तुति । ऐसी कांहीं स्थिति । उरली ना ॥४६५॥
जाण सावधान । करिसी श्रवण । तें चि आमंत्रण । वक्तृत्वासी ॥४६६॥
देवोनियां तया । ऐसें [1] प्रोत्साहन । देव नारायण । काय बोले ॥४६७॥

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते ।
एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥१५॥

म्हणे ऐक ज्ञान–। यज्ञाचें लक्षण । तुज निवेदीन । यथार्थत्वें ॥४६८॥
मूळ-संकल्प हा । यज्ञ-स्तंभ तेथें । पंचमहाभूतें । मंडप तो ॥४६९॥
भेद तो चि पशु । जयाचें हनन । करिती बांधोन । *यज्ञ-स्तंभा ॥४७०॥
विशेष जे गुण । शब्द-स्पर्शादिक । इंद्रियें आणिक । पंचप्राण ॥४७१॥
साहित्य सामुग्री । यज्ञाची ही जाण । आणिक अज्ञान । तें चि तूप ॥४७२॥
मनबुद्धिरूप । यज्ञीय कुंडांत । पेटे धगधगीत । [2]ज्ञान-वन्हि ॥४७३॥
सुख-दुःखादिक –। *द्वन्द्वीं समचित्त । जाण शोभिवंत । [3]वेदिका ती ॥४७४॥
विवेकबुद्धीचें । [4]प्रावीण्य जें तेथें । मंत्र-विद्येचें तें । थोरपण ॥४७५॥
*स्रुक् *स्रुव पळ्या । शांतिरूप दोन । *जीव यजमान । ज्ञान-यज्ञीं ॥४७६॥
घेवोनि तो आत्म–। प्रचीतीचें पात्र । जपे महा-मंत्र । विवेकाचा ॥४७७॥
ऐसा ज्ञानरूप । अग्नि-होत्रें जाण । नाहींसा करोन । टाकी भेद ॥४७८॥
यजिता यजन । ऐसी भाषा लोपे । [5]घृत तें हि संपे । अज्ञानाचें ॥४७९॥
आत्मसमरसीं । *अवभृथ-स्नान । जीव-यजमान । करी जेव्हां ॥४८०॥
तेव्हां महाभूतें । शब्दादि विषय । आणिक इंद्रिय–। गण सर्व ॥४८१॥
न म्हणे हीं भिन्न । जाणे अभिन्नता । ब्रह्मतादात्म्यता । पावोनियां ॥४८२॥
जैसा कोणी एक । पाहें पंडु-सुता । निद्रेंतून येतां । जागृतीसी ॥४८३॥
म्हणे स्वप्नांतील । विचित्र ती सेना । जाहलों होतों ना । स्वयें मी च ॥४८४॥
स्वप्नांतील सेना । नव्हती ती साच । एकला एक च । होतों तेथें ॥४८५॥
तैसें सर्व विश्व । तया याज्ञिकास । येई प्रत्ययास । एकपणें ॥४८६॥

---

*परिशिष्ट पहा. १ उत्तेजन. २ ज्ञानरूप अग्नि. ३ यज्ञकुंडाची वरची बाजू; ओटा. ४ कौशल्य. ५ तूप.

मग जीव-भाव । संपोनि आब्रह्म । भरे परमात्म-। बोधें पूर्ण ।।४८७।।
ज्ञान-यज्ञें ऐसे । भजती कित्येक । जाणोनियां एक-। पणें सर्व ।।४८८।।
आतां अर्जुना, हें । अनादि अनेक । नामरूपादिक । तें हि भिन्न ।।४८९।।
ऐशापरी भेद । विश्वीं जरी नाना । तरी तें भेदे ना । ज्ञान त्यांचें ।।४९०।।
भिन्न भिन्न गात्रें । एका चि देहाचीं । एक चि [1] मरीची । नाना [2] रश्मि ।।४९१।।
ना तरी साचार । शाखा सान थोर । परी तरुवर । एकला चि ।।४९२।।
तैसीं नाना नामें । नानाविध व्यक्ति । आणिक त्या वृत्ति । वेगळाल्या ।।४९३।।
ऐसीं भिन्न भिन्न । भूतें तरी साच । मज एकाचीं च । जाणती ते ।।४९४।।
ऐसा ज्ञान-यज्ञ । आचरती चांग । वेगळाले भाग । स्वीकारोनि ।।४९५।।
परी जाणते ते । म्हणोनि तयांचें । ज्ञान एकत्वाचें । भेदे चि ना ।।४९६।।
किंवा जेव्हां जेथें । देखती जें कांहीं । मजविण नाहीं । हा चि बोध ।।४९७।।
पाहें बुडबुडा । जाय जेथें जेथें । आहे तया तेथें । उदक चि ।।४९८।।
मग तो तैसा चि । राहे किंवा [3] विरे । तरी तें हि सारें । उदकीं च ।।४९९।।
वातें उडवितां । [4] मृत्तिकेचे कण । काय पृथ्वीपण । जाय त्यांचें ? ।।५००।।
आणि मागुतीं ते । आले जरी खालीं । तरी तयां झेली । धरणी च ।।५०१।।
तैसें हवें तेथें । हवें त्या स्थितींत । पार्था, वस्तुजात । असो नसो ।।५०२।।
परी सर्वपणें । मी च तें समस्त । ऐसी च [5] प्रचीत । असे त्यांची ।।५०३।।
धनंजया, माझी । जेवढी ही व्याप्ति । तेवढी [5] प्रतीति । तयांची हि ।।५०४।।
ऐसे ते मद्रूप । होवोनि अनेक । नानाकारीं देख । वावरती ।।५०५।।
पाहूं जातां सदा । सूर्य-बिंब जैसें । सन्मुख चि दिसे । सर्वांलागीं ।।५०६।।
तैसें सर्वव्यापी । तयांचें तें ज्ञान । सर्वांसी म्हणोन । [6] सन्मुख ते ।।५०७।।
तयांचिया ज्ञाना । नाहीं पाठपोट । नभीं [7] सर्वगत । वायु जैसा ।।५०८।।
तैसा तेवढा चि । तयांचा सद्भाव । जेवढा मी देव । परिपूर्ण ।।५०९।।
म्हणोनि तयांचें । होतसे भजन । न करितां जाण । स्वभावें चि ! ।।५१०।।
एऱ्हवीं सकळ । मी च तरी मज । भजे ना सहज । कोण कोठें ? ।।५११।।

---

१ सूर्य. २ किरण. ३ विरघळून गेला. ४ मातीचे. ५ अनुभव. ६ समोर. ७ सर्वव्यापक.

परी जयांलागीं । नाहीं ऐसें ज्ञान । न घडे भजन । तयांसी गा ॥५१२॥
असो ज्ञान-यज्ञ । करोनि उचित । यजिती ते भक्त । सांगितले ॥५१३॥
होतसे अर्पण । सकळांचे द्वारा । मज सर्वेश्वरा । सर्व कांहीं ॥५१४॥
नित्य निरंतर । ऐसें चि हें जाण । सहज भजन । घडतसे ॥५१५॥
परी मतिमंद । नेणती हें कांहीं । म्हणोनियां नाहीं । माझी प्राप्ति ॥५१६॥

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाऽहमहमौषधम् ।
मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम् ॥१६॥

ज्ञानाचा उदय । अंतरीं होईल । तरी तो [1] मुदल । वेद मी च ॥५१७॥
आणि तो जें सांगे । विधि अनुष्ठान । 'क्रतु' तो हि जाण । मी च असें ॥५१८॥
तया कर्मांतून । यज्ञ [2] सांगोपांग । प्रकटे जो मग । तो हि मी च ॥५१९॥
देवां-पितरांसी । आहुति जी देती । अन्न तें किरीटी । मी च जाण ॥५२०॥
मी च सोमादिक । वनस्पति नाना । [3] आज्य मी अर्जुना । समिधा मी ॥५२१॥
मंत्र होम-द्रव्य । ऋत्विज हि मी च । स्वरूप माझें च । अग्नि तो हि ॥५२२॥
तयामाजीं जें जें । करिती हवन । तें तें सर्व जाण । मी च आहें ॥५२३॥

पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः ।
वेद्यं पवित्रमोंकार ऋक्सामयजुरेव च ॥१७॥

१५ ज्याच्या अंग-संगें । प्रकृति अष्टांग । प्रसवते जग । पिता तो मी ॥५२४॥
पाहें जेविं * अर्ध-। नारी-नटेश्वरीं । पुरुष जो नारी । तो चि होय ॥५२५॥
तेविं चराचरीं । जगन्माता मी च । मी च [4] धाता साच । विश्वाचा ह्या ॥५२६॥
होवोनि उत्पन्न । जग जेथें राहे । आणि वाढताहे । जीवित हें ॥५२७॥
सर्वथा साचार । अर्जुना, तें स्थान । जाण मजवीण । दुजें नोहे ॥५२८॥
प्रकृति-पुरुष । जाहलीं उत्पन्न । जयाच्या * अमन-। मनामाजीं ॥५२९॥
तो मी त्रिभुवनीं । संपूर्ण विश्वाचा । [5] पितामह साचा । पंडु-सुता ॥५३०॥
सर्व ज्ञानमार्ग । जया गांवा येती । जयातें बोलती । वेद [6] 'वेद्य' ॥५३१॥
पडोनि उमज । नाना मतें जेथें । पावती ऐक्यातें । स्वभावें चि ॥५३२॥

---

* परिशिष्ट पहा. १ मुख्य; मूळचा. २ संपूर्ण. ३ तूप. ४ उत्पादक; कर्ता. ५ आजोबा.
६ जाणावयाजोगें.

आणि झाली जेथें । धनंजया देख । शास्त्रांसी ओळख । एकमेकां ॥५३३॥
जेथ होती ज्ञानें । चुकलीं एकत्र । ऐसें जें पवित्र । तें हि मी च ॥५३४॥
*घोष-ध्वनि-नाद–। आकाराचें स्थान । धनंजया जाण । असे जो का ॥५३५॥
ऐसा तो ॐकार । मी च गा साचार । होय जो अंकुर । ब्रह्मबीजा ॥५३६॥
अ उ म अक्षरें । जयाचिया पोटीं । उपजतां होती । तिन्ही वेद ॥५३७॥
म्हणोनि ऋग्वेद । आणि यजु:साम । म्हणे आत्माराम । मी च तिन्ही ॥५३८॥
ऐसी जी का वेद–। परंपरा साच । सर्व हि ती मी च । धनंजया ॥५३९॥

गतिर्भर्ता प्रभु: साक्षी निवास: शरणं सुहृत् ।
प्रभव: प्रलय: स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥१८॥

धनंजया, जिया । प्रकृतीच्या पोटीं । चराचर सृष्टि । सांठवे ही ॥५४०॥
शिणोनि ती जेथें । घेतसे [१] विश्राम । सर्वथा परम–। गति ती मी ॥५४१॥
जयाचिया योगें । प्रकृति ही साच । आली नसती च । आस्तित्त्वासी ॥५४२॥
आणि सत्तामात्रें । जयाच्या साचार । सर्व चराचर । प्रसवे जी ॥५४३॥
त्या चि प्रकृतीच्या । होवोनि स्वाधीन । भोगी जो *त्रिगुण । ऐसें वाटे ॥५४४॥
[२] विश्व-श्रियेचा तो । [३] भर्ता मी च येथ । अर्जुना, यथार्थ । जाण ऐसें ॥५४५॥
आणिक सकळ । त्रैलोक्याचा स्वामी । असें कैसा तो मी । ऐक आतां ॥५४६॥
आकाशें सर्वदा । सर्वत्र वसावें । क्षण हि नसावें । वातें स्वस्थ ॥५४७॥
जाळोनि टाकावें । [४] पावकें सकळ । वर्षावें सजळ । मेघ-राजें ॥५४८॥
पर्वतें बैठक । न कधीं सोडावी । सीमा [५] नोलांडावी । सागरानें ॥५४९॥
धरणीनें प्राणी । करावे धारण । अर्जुना, ही जाण । आज्ञा माझी ॥५५०॥
मी च बोलविला । तरी वेद बोले । चालविला चाले । सूर्य तो हि ॥५५१॥
मी च हालविला । तरी प्राण हाले । विश्व हें सगळें । चाळवी जो ॥५५२॥
माझ्या चि आज्ञेनें । भूतें ग्रासी काळ । ऐसीं हीं सकळ । [६] आज्ञांकित ॥५५३॥
जयाचीं गा होती । ऐसा जो समर्थ । तो मी जगन्नाथ । जाण पार्था ॥५५४॥
असोनि सर्वत्र । गगनासमान । राहे उदासीन । तो हि मी च ॥५५५॥

---

*परिशिष्ट पहा. १ विसावा. २ विश्वलक्ष्मीचा. ३ पति. ४ अग्नीनें. ५ ओलांडू नये. ६ आज्ञाधारक.

नामरूपात्मक । चराचरीं देख । भरलासे एक । अंतर्बाह्य ॥५५६॥
तेविं चि आधार । होवोनियां राही । नाम-रूपाचा हि । स्वभावें जो ॥५५७॥
जळाचे चि जैसे । जाहले कल्लोळ । कल्लोळीं तों जळ । असे जैसें ॥५५८॥
तैसी होय जेथें । विश्वाची रचना । असें मी अर्जुना । निवास तो ॥५५९॥
अनन्य-शरण । येई मज तरी । तयाचे निवारीं । जन्म-मृत्यु ॥५६०॥
शरणागतासी । म्हणोनि आश्रय । मी च एक होय । निरंतर ॥५६१॥
पार्था, जैसे जैसे । प्रकृतीचे भेद । तैसा चि विविध । होवोनियां ॥५६२॥
प्राणीमात्रामाजीं । प्राण-रूपें येथ । [१] वर्ततों जगांत । मी च एक ॥५६३॥
जैसा सागरांत । तैसा [२] थिल्लरांत । भास्कर बिंबत । सारिखा च ॥५६४॥
तैसा ब्रह्मादिकां-। पासोनि कीटकां-। पर्यंत मी सखा । सर्वांलागीं ॥५६५॥
जाण त्रैलोक्याचें । जीवन मी साचें । सर्ग-संहाराचें । मूळ तें मी ॥५६६॥
प्रकटती शाखा । जैशा बीजांतून । पुन्हां बीजीं लीन । वृक्षत्व तें ॥५६७॥
संकल्पाच्या योगें । तैसें विश्व होय । संकल्पीं च लय । पावे पुन्हां ॥५६८॥
ऐसा [३] जगद्बीज । मूळ जो संकल्प । वासनास्वरूप । अति सूक्ष्म ॥५६९॥
स्वभावें तो जेथें । कल्प-क्षयीं राहे । स्थान तें मी आहें । जाण पार्था ॥५७०॥
जाण पार्था, जेथें । एकीं निराकारीं । नाम रूपें सारीं । हारपती ॥५७१॥
आणि वर्ण-व्यक्ति । आटोनियां जाती । जेथें नष्ट होती । जाति-भेद ॥५७२॥
सर्व हि संकल्प-। वासना-संस्कार । पुन्हां चराचर । रचावया ॥५७३॥
जेथें राहोनियां । असती अमर । [४] निधान साचार । तें हि मी च ॥५७४॥

तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च ।
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ॥१९॥

सूर्य-रूपें मी च । पाडोनियां ऊन । टाकितों शोषून । विश्व सारें ॥५७५॥
मग मी च इंद्र । होवोनि [५] वर्षतां । तें चि [६] समृद्धता । पावे पुन्हां ॥५७६॥
पाहें पार्था, अग्नि । जैसे काष्ठ खाय । मग तें चि होय । अग्निरूप ॥५७७॥
मरतें मारितें । तैसें असे जें जें । स्वरूप तें माझें । ऐसें जाण ॥५७८॥

---

१ राहतों.　२ डबक्यांत.　३ जगाच्या उत्पत्तीचें कारण.　४ स्थान.　५ पाऊस पाडल्यावर.　६ सुकाळ.

[१] मृत्यूचिया भागीं । म्हणोनि जें कांहीं । धनंजया तें हि । रूप माझें ॥५७९॥
आणि वस्तुमात्रीं । तत्त्व अमर जें । तें तंव सहजें । मी च आहें ॥५८०॥
बहु बोलोनियां । सांगावें जें कांहीं । सर्व हि तें घेईं । एकदां च ॥५८१॥
तरी अविनाश । तेविं नाशिवंत । जाण हें समस्त । मी च आहें ॥५८२॥
म्हणोनि मी नसें । ऐसा नाहीं ठाव । सर्वत्र सदैव । संपूर्ण मी ! ॥५८३॥
परी प्राणी पाहें । कैसे दैवहीन । न घेती दर्शन । नित्य माझें ॥५८४॥
गेले जळावीण । तरंग सुकोन । रश्मि दीपावीण । देखती ना ॥५८५॥
नवल हें तैसें । असोनि मद्रूप । नेणती स्वरूप । आपुलें ते ॥५८६॥
विश्वीं अंतर्बाह्य । कोंदलों मी एक । मद्रूप चि देख । त्रैलोक्य हें ॥५८७॥
परी कैसें कर्म । आड आलें जीवां । नेणती [२] मद्‌भावा । [३] नास्तिक ते ॥५८८॥
अमृताचे कूपीं । पडोनि साचार । म्हणावें बाहेर । काढा ऐसें ॥५८९॥
तया करंट्यांची । तैसी गति होय । तेथें कोणें काय । करावें गा ! ॥५९०॥
घांसभरी अन्न । मिळावें म्हणोन । धांवे वणवण । अंध जैसा ॥५९१॥
* चिंतामणिवरी । मग पडे पाय । तरी पुढें जाय । लाथाडोनि ॥५९२॥
तैसें जरी ज्ञान । सोडोनियां जाय । ऐसी स्थिती होय । प्राणियाची ॥५९३॥
म्हणोनियां जें जें । केलें ज्ञानाविण । तें तें वृथा जाण । धनुर्धरा ॥५९४॥
अंध गरुडाचे । पंख तरी चांग । परी उपयोग । काय त्यांचा ? ॥५९५॥
तैसे सत्कर्माचे । सायास जे होती । ते तों वृथा जाती । ज्ञानाविण ॥५९६॥

त्रैविद्या मां सोमपा: पूतपापा
यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते ॥
ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोक–
मश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥२०॥

* वर्णाश्रमधर्में । वर्तोनि किरीटी । कसोटी जे होती । विधिमार्गा ॥५९७॥
कैसे तिन्ही वेद । डोलविती मान । कौतुकें यजन । चाले जेव्हां ॥५९८॥
जयांपुढें ठाके । यज्ञक्रिया [४] मूर्त । घेवोनि हातांत । फळभोग ॥५९९॥

---

१ मरणारे.  २ माझ्या स्वरूपाला.  ३ ईश्वराचें (आत्म्याचें) अस्तित्व न मानणारे; पाखंडी.  ४ मूर्तिमंत.

यज्ञमूर्ति ऐसे । [१] दीक्षित सुजाण । *सोमरस-पान । करिती जे ।।६००।।
पार्था तयांनीं त्या । पुण्याचिया नांवें । जोडलें आघवें । पातक चि ।।६०१।।
तीन हि वेदांत । होती पारंगत । आचरती शत । यज्ञ जरी ।।६०२।।
तरी तें यजन । अर्पिती ना मज । स्वर्ग-सुख-काज । धरोनियां ।।६०३।।
बैसोनि हि जैसा । कल्पतरूखालीं । गांठवीत झोळी । दैवहीन ।।६०४।।
आणि मग धांवे । मागावया भीक । तैसें चि हें देख । याज्ञिकांचें ।।६०५।।
शतावधि यज्ञीं । यजोनियां मातें । इच्छिती स्वर्गातें । [२] भोग-लुब्ध ।।६०६।।
सांग म्हणावें का । ह्यातें पुण्याचार । पाप चि साचार । नव्हे का हें ।।६०७।।
मजवीण झालें । स्वर्ग-सुख प्राप्त । तरी पुण्य-पंथ । मूढांचा तो ।।६०८।।
तया सुखा ज्ञानी । संबोधिती हानि । विघ्न तें म्हणोनि । उपेक्षिती ।।६०९।।
एऱ्हवीं पाहोन । नरकींचें दुःख । स्वर्गालागीं सुख । ऐसें नांव ।।६१०।।
परंतु जें सत्य । नित्यानंदमय । निर्दोष तें होय । रूप माझें ।।६११।।
स्वर्ग-नरक हे । जीवा नागवून । माझियापासून । दूर नेती ।।६१२।।
म्हणोनियां जाण । धनुर्धरा चांग । दोन्ही आडमार्ग । चोरांचे हे ।।६१३।।
पुण्यात्मकें पापें । यावें स्वर्गलोकीं । पडावें नरकीं । पापात्मकें ।।६१४।।
मग जेणें माझ्या । स्वरूपाची प्राप्ति । तें चि गा किरीटी । शुद्ध पुण्य ।।६१५।।
सर्व मदंतरीं । असोनियां जीव । दुरावें मी देव । जेणें कर्में ।।६१६।।
तया पुण्य-कर्म । ऐसें संबोधितां । न तुटे का पार्था । जीभ तेथें ? ।।६१७।।
असो, ऐशा रीती । यजोनियां मातें । चित्तीं वांछिती ते । स्वर्ग-भोग ।।६१८।।
जेणें प्राप्त नोहे । अर्जुना, मद्रूप । ऐसें पापरूप । पुण्य जें का ।।६१९।।
तेणें पुण्यें मग । लाहोनियां बळ । गांठिती [३] वेल्हाळ । स्वर्ग-लोक ।।६२०।।
जेथें अमरत्व । हें चि सिंहासन । राजधानी-स्थान । अमरावती ।।६२१।।
जेथें ऐरावता-। सारिखें वाहन । कोठारें हि पूर्ण । अमृताचीं ।।६२२।।
जेथें * अष्टमहा-। सिद्धींचीं भांडारें । आणिक खिल्लारें । [४] सुरभींचीं ।।६२३।।
जेथें चिंतामणि-। रत्नांची जमीन । उभे देवगण । सेवेसाठीं ।।६२४।।

---

*परिशिष्ट पहा. १ दीक्षा घेतलेले. २ भोगांची हांव असलेले. ३ सुंदर; प्रिय. ४ कामधेनूंचीं.

कल्पवृक्षांचीं च । जेथें [१] क्रीडोद्यानें । नित्य चाले गाणें । गंधर्वांचें ॥६२५॥
विलासिनींमाजीं । * उर्वशी प्रमुख । आणि * रंभादिक । नृत्याङ्गना ॥६२६॥
शय्यागृहामाजीं । जोडोनियां हात । उभा मूर्तिमंत । कामदेव ॥६२७॥
करी जेथें चंद्र । सडा-संमार्जन । शिंपोनि किरण । अमृताचे ॥६२८॥
आणि वायुऐसे । धांवणारे दूत । पाहती गा वाट । आज्ञेची च ॥६२९॥
बृहस्पति आदि–। करोनि ब्राह्मण । इच्छिती कल्याण । आशीर्वादें ॥६३०॥
लोक-पाळांचिया । तोडीचे विख्यात । असती [२] राऊत । जिये स्थानीं ॥६३१॥
करोनियां पंक्ति । देव उभे ठेले । पुढें अश्व चाले । उच्चै:श्रवा ॥६३२॥
असो हें, पुण्यांश । तोंवरी च देख । ऐसें स्वर्ग-सुख । भोगिती ते ॥६३३॥

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं
क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना
गतागतं कामकामा लभन्ते ॥२१॥

परी त्या पुण्याची । संपतां चि [३] पुंजी । ओसरते तेजी । इंद्रत्वाची ॥६३४॥
मग त्याच भव्य । दिव्य-लोकांतून । येती परतोन । मृत्यु-लोकीं ॥६३५॥
वेश्येचिया भोगीं । संपतां संपत्ति । उभें करी ना ती । दाराशीं हि ॥६३६॥
तैसें लज्जास्पद । होतसे जीवन । तयां पुण्यहीन । याज्ञिकांचें ॥६३७॥
मज शाश्वताचें । नेणोनियां वर्म । झाले [४] स्वर्ग-काम । पुण्य-कर्मे ॥६३८॥
अमरता त्यांची । जावोनियां वायां । अंतीं पुन्हा तयां । मृत्यु-लोक ॥६३९॥
जैसें स्वप्नामाजीं । सांपडलें धन । जाय हारपून । जागृतींत ॥६४०॥
पार्था, वेदज्ञांचें । तैसें स्वर्ग-सुख । सर्वथा क्षणिक । जाणावें गा ॥६४१॥
वेदविद्येमाजीं । जाहला प्रवीण । परी माझें ज्ञान । नाहीं जरी ॥६४२॥
तरी जाण तैसा । व्यर्थ तो बापुडा । दाण्याविण कोंडा । पाखडिला ॥६४३॥
म्हणोनियां पार्था । धर्म हे वेदोक्त । मजविण होत । [५] निरर्थक ॥६४४॥
जाणोनियां मातें । नेणशील कांहीं । तरी च तूं पाहीं । सुखी होसी ॥६४५॥

---

१ खेळण्याकरितां बागा. २ सरदार; घोडेस्वार. ३ सांठा. ४ स्वर्गाची इच्छा करणारे. ५ व्यर्थ.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जना: पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥२२॥

जयांनीं आपुलें । मजलागीं चित्त । केलें समर्पित । सर्वभावें ॥६४६॥
मातेचिया पोटीं । मूल तें गर्भस्थ । राहतसे स्वस्थ । जैशा रीती ॥६४७॥
तैसें मजविण । आणिक बरवें । दिसे ना स्वभावें । जयांलागीं ॥६४८॥
निरंतर माझें । करावें भजन । तरी च जीवन । सार्थ वाटे ॥६४९॥
ऐसे एकनिष्ठ । होवोनियां जीवें । मज सर्वभावें । चिंतोनियां ॥६५०॥
नित्य उपासिती । जे का मज देवा । तयांची तों सेवा । मी च करीं ॥६५१॥
मग मजमाजीं । [1]तल्लीन ते होतां । वाहतसें चिंता । मी च त्यांची ॥६५२॥
पक्षिणीचा जीव । जैसा पिलांठायीं । पंख आले नाहीं । जयांलागीं ॥६५३॥
तैसें करीं मी च । तयांचें समस्त । जें जें माझे भक्त । अपेक्षिती ॥६५४॥
आपुली तहान–। भूक विसरोन । बाळातें जतन । करी माय ॥६५५॥
तैसे मनोभावें । अनन्य-शरण । तयांचें रक्षण । करीं मी च ॥६५६॥
जरी तयां माझ्या । *सायुज्याची [2]चाड । तरी ते हि लाड । पुरवितों ॥६५७॥
इच्छिती ते सेवा । तरी निरंतर । प्रेमाचा पदर । आड ठेवीं ॥६५८॥
जें जें भाविती तें । मी च तयां द्यावें । दिलें हि ठेवावें । संरक्षोनि ॥६५९॥
ऐसा योग-क्षेम । तयांचा आघवा । सर्वथा पहावा । लागे मज ॥६६०॥
कां जे सर्वभावें । मज निरंतर । मानिती आधार । एकासी च ॥६६१॥

येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विता: ।
तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥२३॥

सर्वव्यापकातें । मज नेणोनियां । नाना [3]संप्रदायां । स्वीकारोनि ॥६६२॥
अग्नि-इंद्र-सूर्य–। सोमासी आहुति । देवोनि यजिती । जे जे कोणी ॥६६३॥
तयांचें हि पावे । सर्व तें मातें च । सर्वांठायीं मी च । म्हणोनियां ॥६६४॥
परी भक्तीची ती । नव्हे उजू रीत । असे [4]विपरीत । भाव त्यांचा ॥६६५॥
पाहें वृक्षालागीं । शाखा पानें साचीं । एका चि बीजाचीं । जरी होती ॥६६६॥

---

*परिशिष्ट पहा. १ गढून गेलेले. २ इच्छा. ३ पंथांना. ४ उलट; भिन्न प्रकारचा (चुकीचा).

तरी करी मूळ । जळाचें सेवन । घालावें जाणोन । तेथें चि तें ।।६६७।।
ना तरी एका चि । देहाचीं दहा हि । जरी होती पाहीं । इंद्रियें हीं ।।६६८।।
आणि तयांनीं जे । सेवावे विषय । भोक्ता जरी होय । एक त्यांचा ।।६६९।।
तरी करोनियां । पक्वान्नें बरवीं । कैसीं तीं भरावीं । कानामाजीं ? ।।६७०।।
पुष्पें सुगंधित । आणोनियां चांग । लावावीं का सांग । [१]लोचनासी ? ।।६७१।।
तेथें रस जो तो । मुखें चि सेवावा । [२]परिमळ घ्यावा । नासिकेनें ।।६७२।।
तैसा सर्वांठायीं । मी च हें जाणोन । करावें यजन । माझें पार्था ।।६७३।।
नेणोनियां मातें । करिती भजन । तरी तो गा शीण । वाउगा च ।।६७४।।
ज्ञान हें चि जाण । कर्माचे लोचन । असावें संपूर्ण । निर्दोष तें ।।६७५।।

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।
न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्चवन्ति ते ।।२४।।

सकल हि यज्ञ–। सामुग्रीचा भोक्ता । मजविण पार्था । कोण आहे? ।।६७६।।
सर्व हि यज्ञांचा । मी च आदि अंत । नेणोनि हें [३]भ्रांत । पूजी देवां ।।६७७।।
जैसें गंगा-जळ । अर्पिती गंगेस । देव-पितरांस । उद्देशोनि ।।६७८।।
तैसें माझें मज । अर्पिती तें सर्व । परी भिन्न भाव । ठेवोनियां ।।६७९।।
भिन्नभाव चित्तीं । म्हणोनि किरीटी । तयांलागीं प्राप्ति । नाहीं माझी ।।६८०।।
मग जेथें जेथें । बाळगिती आस्था । तें तें चि सर्वथा । पावती ते ।।६८१।।

यान्ति देवव्रता देवान्पितृन्यान्ति पितृव्रता: ।
भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम् ।।२५।।

काया-वाचा-मनें । उपासिती जे का । देवा इंद्रादिकां । भक्तिभावें ।।६८२।।
तयांलागीं होय । अर्जुना [४]देहान्तीं । देवत्वाची प्राप्ति । स्वर्गलोकीं ।।६८३।।
किंवा श्राद्धादिक । पितरांचीं व्रतें । आचरिती येथें । मनोभावें ।।६८४।।
तयांचें जीवन । संपताक्षणींच । पावती ते साच । पितृलोक ।।६८५।।
*जारण-मारण । इत्यादि अघोर । [५]प्रयोग साचार । आचरोनि ।।६८६।।
क्षुद्रदेवतादि । भूतपिशाच्चांतें । मानोनि दैवतें । पूजिती जे ।।६८७।।

---

१ डोळ्यांना. २ वास; ३ अज्ञानी; भ्रमांत सापडलेला. ४ देह सोडल्यावर. ५ मंत्रयोजना.

तयांलागीं होय । भूतत्वाची प्राप्ति । सोडोनियां जाती । देह जेव्हां ॥६८८॥
ऐशापरी जैसा । जयांचा संकल्प । कर्मे फलद्रूप । तैसीं तयां ॥६८९॥
मग मी च कानीं । ऐकिला जयांनीं । देखिला नयनीं । मी च एक ॥६९०॥
[1]भाविला जयांनीं । मी च एक मनीं । नाम-संकीर्तनीं । रंगोनियां ॥६९१॥
वंदिला सर्वांगीं । सर्वांठायीं एक । दान-पुण्यादिक । [2]मत्प्रीत्यर्थ ॥६९२॥
जेणें ज्ञानें होय । माझें चि दर्शन । तें चि अध्ययन । केलें ज्यांनीं ॥६९३॥
माझ्या चि स्वरूपीं । ठेवोनियां प्रीति । पावले जे तृप्ति । अंतर्बाह्य ॥६९४॥
सर्व हि जीवन । माझ्या कारणीं च । लाविती जे साच । मनोभावें ॥६९५॥
हरि-दास्य हें चि । आम्हांसी भूषण । ऐसें जे मीपण । मिरविती ॥६९६॥
जयांलागीं एक । लोभ तो माझा च । म्हणोनि जे साच । लोभी होती ॥६९७॥
कामना माझी च । म्हणोनि सकाम । जाहले सप्रेम । माझ्या प्रेमें ॥६९८॥
पावोनि मद्रूप । भुलोनियां गेले । जाणों विसरले । लोकांलागीं ॥६९९॥
जाणती मातें च । जयांचीं गा शास्त्रें । जयांचिया मंत्रें । लाभें मी च ॥७००॥
ऐशापरी ज्यांचे । सर्व हि व्यापार । होती निरंतर । माझ्यासाठीं ॥७०१॥
मरणापूर्वीं च । मद्रूप ते साच । तयां गति मी च । देहान्तीं हि ॥७०२॥
म्हणोनियां माझें । करिती यजन । तयां ऐक्य पूर्ण । मद्रूपीं च ॥७०३॥
तयांनीं तों केलें । [3]आत्म-समर्पण । निमित्त करोन । पूजनाचें ॥७०४॥
धनंजया आत्म-। समर्पणावीण । नाकळें मी जाण । कोणातें हि ॥७०५॥
आम्ही ब्रह्मज्ञानी । ऐसें म्हणे कोणी । तरी तो अज्ञानी । हें चि साच ॥७०६॥
झालें मज ज्ञान । ऐसा अभिमान । धरी तरी [4]न्यून । तें चि तया ॥७०७॥
पाहूं जाती माझें । परमात्मरूप । यज्ञ-दान-तप । आचरोनि ॥७०८॥
तरी तया नाहीं । काडीचें हि मोल । कर्माचा तो [5]डौल । फोल त्यांचा ॥७०९॥
ज्ञान-बळें थोर । कोण वेदाहून । तो हि राहे मौन । धरोनियां ॥७१०॥
*शेषाहून श्रेष्ठ । बोलका नाहीं ना । तो हि अंथरुणा-। तळीं दडे ॥७११॥
छंद जो घेवोनि । *सनकादि मुनि । राहिले होवोनि । वेडे पिसे ॥७१२॥

---

* परिशिष्ट पहा. १ चिंतन केलें. २ माझ्यासाठी. ३ जीवभाव अर्पण केला. ४ उणे; कमीपणा. ५ ऐट.

थोराहून थोर । शंभु जो साचार । करितां विचार । तापसांचा ॥७१३॥
तो हि अभिमान । सांडोनि समस्त । पाहें * पद-तीर्थ । माथां वाहे ॥७१४॥
[१] पद्मजेसमान । सर्वथा संपन्न । सांग दुजी कोण । असे पार्था ॥७१५॥
जियेचिया घरीं । [२] श्रियेऐशा दासी । सादर सेवेसी । निरंतर ॥७१६॥
खेळतां तयांनीं । केलीं घरकुलें । तयां नांव दिलें । इंद्र-पुरी ॥७१७॥
तरी इन्द्रादिक । सर्व हि तयांचीं । न होती का साचीं । बाहुलीं च ? ॥७१८॥
मग तयांसी तो । नावडोन खेळ । मोडिती सकळ । [३] घराचार ॥७१९॥
तेव्हां महेन्द्राचे । दीन हीन रंक । न होती का एक । क्षणामाजीं ? ॥७२०॥
ज्या ज्या वृक्षाकडे । फेकिती त्या दृष्टि । ते ते सर्व होती । कल्प-वृक्ष ॥७२१॥
सामर्थ्यसंपन्न । ऐशापरी दासी । घरीं जियेपाशीं । वावरती ॥७२२॥
इंदिरा जी ऐसी । मुख्य मालकीण । ती हि अभिमान । सांडोनियां ॥७२३॥
लीनपणें पायां–। पाशीं च बैसोन । सर्वस्व अर्पून । करी सेवा ॥७२४॥
म्हणोनि सांडावें । दूर थोरपण । तेविं अभिमान । पांडित्याचा ॥७२५॥
आणि जगीं व्हावें । लीनाहून लीन । तरी [४] सन्निधान । लाभे माझें ॥७२६॥
उघडितां नेत्र । भास्करें सहज । चंद्र हि निस्तेज । होय जेथें ॥७२७॥
तेथें काजव्यानें । मिरवावें किती । आपुली ती दीप्ति । दाखवोनि ॥७२८॥
तैसें तप जेथें । पुरे ना शंभूचें । ऐश्वर्य लक्ष्मीचें । उणें वाटे ॥७२९॥
तेथें हें प्राकृत । [५] हेंदरें मानव । परमात्मभाव । केविं जाणे ? ॥७३०॥
ह्या चि लागीं पार्था । वैभवाचा गर्व । सांडोनियां सर्व । लीनपणें ॥७३१॥
सकळ गुणांचें । उतरावें लोण । समूळ सांडोन । देह-भाव ॥७३२॥

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥२६॥

मग कोणतें हि । मिळेल जें फळ । नीरस रसाळ । असो कैसें ॥७३३॥
तें चि अर्पावया । भक्तिभावें भलें । मजपुढें केलें । भक्त-राजें ॥७३४॥
तरी तें घेवोनि । न फेडितां देंठ । सेवितों यथेष्ट । आवडीनें ॥७३५॥

---

१ लक्ष्मीसारखी. २ ऋद्धीसारख्या. ३ घरकुलाचा खेळ. ४ जवळीक. ५ गचाळ; अडाणी.

ना तरी अनन्य–। भक्तीचिया नांवें । जरी मज द्यावें । फूल एक ।।७३६।।
तरी तो सुगंध । न हुंगितां साच । तें हि मी मुखीं च । घालीतसें ।।७३७।।
फुलें तीं राहोत । परी पान एक । शुष्क वा [१] साजूक । असो कैसें ।।७३८।।
तरी सर्वभावें । भरलें देखोन । सुखें स्वीकारोन । खाऊं लागें ।।७३९।।
अगा भुकेल्यातें । लाभावें अमृत । मग तेणें तृप्त । व्हावें जैसें ।।७४०।।
अमृतासमान । भक्ताचें तें पान । देई समाधान । तैसें मज ।।७४१।।
ना तरी प्रसंगें । न जोडे पाला हि । सांकडें तों नाहीं । उदकाचें ।।७४२।।
उदकातें काय । द्यावें लागे मोल । तें तरी मिळेल । हवें तेथें ।।७४३।।
तें चि घेवोनियां । मजलागीं भलें । जेणें समर्पिलें । सर्वभावें ।।७४४।।
भव्य जें वैकुंठ । तयाहून थोरें । बांधिलीं मंदिरें । तेणें मज ।।७४५।।
*कौस्तुभापासोन । निर्मळ [२] आगळीं । लेणीं लेवविलीं । मज तेणें ।।७४६।।
[३] क्षीराब्धिसमान । रम्य [२] शय्या-स्थानें । निर्मिलीं गा तेणें । असंख्यात ।।७४७।।
कर्पूर चंदन । आणि *कृष्णागरु । ह्यांचा महा-मेरु । सुगंधित ।।७४८।।
समर्पोनि मज । तेणें दीपमाळ । लाविली उज्ज्वळ । आदित्यांची ।।७४९।।
तेणें मज कल्प–। वृक्षांचीं उद्यानें । अर्पिलीं गो-धनें । सुरभींचीं ।।७५०।।
*गरुडासारिखीं । वाहनें अपार । वाहिलीं साचार । तेणें मज ।।७५१।।
दिव्यामृताहून । रसाळ जीं देख । पक्वान्नें अनेक । वाढिलीं गा ।।७५२।।
समर्पिला भक्तें । उदकाचा लेश । तरी ऐसा तोष । होय मज ।।७५३।।
काय सांगावें हें । *सुदाम्याचे पोहे । भक्षिले तें आहे । तुज ठावें ।।७५४।।
न म्हणें हा सान । न म्हणें हा थोर । जाणें मी साचार । भक्ति एक ।।७५५।।
असे भक्ति-भाव । जयांचे अंतरीं । तेथें वास करीं । निरंतर ।।७५६।।
जाण पार्था, जळ । पत्र पुष्प फळ । [५] मिष हें केवळ । भजावया ।।७५७।।
अनन्य-भक्ताचें । भक्ति-तत्त्व शुद्ध । तेथें चि संबंध । आमुचा गा ।।७५८।।
म्हणोनियां पार्था । ऐक सावधान । करीं गा स्वाधीन । बुद्धि एक ।।७५९।।
मनोमंदिरांत । सहजें साचार । न पडो विसर । माझा तुज ।।७६०।।

---

*परिशिष्ट पहा. १ ताजें; टवटवीत. २ विशेष प्रकारचीं. ३ क्षीरसागर. ४ झोपण्याच्या जागा. ५ निमित्त.

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।।२७।।

करिसी जे कांहीं । व्यापार उद्योग । भोगिसी जे भोग । बहुविध ।।७६१।।
पाहोनियां [1]पात्र । करिसी जें दान । ना तरी यजन । नाना रीती ।।७६२।।
तपोव्रतादिक । करिसी साधनें । वांटिसी [2]वेतनें । सेवकांसी ।।७६३।।
ऐसें जें जें कर्म । होईल स्वभावें । भावें समर्पावें । तें तें मज ।।७६४।।
परी कर्तृत्वाची । नको आठवण । ऐसें तें धुवोन । द्यावें मज ।।७६५।।

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनैः ।
संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ।।२८।।

[3]दग्ध बीजें जैसीं । पेरिलीं भूमींत । तरी नाहीं येत । अंकुरोनि ।।७६६।।
तैसें शुभाशुभ–। कर्म-फळ तया । न बाधे माझिया । भक्तालागीं ।।७६७।।
द्यावयासी फळ । सुखदुःखरूपें । उरेल स्वरूपें । जरी कर्म ।।७६८।।
तरी भोगावया । तें चि सुखदुःख । जीवा देह एक । घ्यावा लागे ।।७६९।।
परी सर्व कर्में । होतां मदर्पण । संपलें जनन–। मरण हि ।।७७०।।
जन्म-मृत्यूंतून । भक्त होतां मुक्त । सुखदुःखातीत । स्वभावें चि ।।७७१।।
म्हणोनि लागे ना । जेणें दीर्घ काळ । स्व-रूप निर्मळ । जाणावया ।।७७२।।
ऐसी संन्यासाची । सुगम ही खूण । दिली दाखवून । तुजलागीं ।।७७३।।
देह-बंधनांत । नको पडूं आतां । नको बुडूं पार्था । सुख-दुःखीं ।।७७४।।
नित्य निरंतर । जो मी सुखरूप । तेथें चि [4]तद्रूप । सुखें होईं ।।७७५।।

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ।।२९।।

सदा सर्वां भूतीं । सारिखा मी देव । आपपरभाव । नाहीं तेथें ।।७७६।।
जाणोनियां माझें । ऐसें चि स्वरूप । उपटोनि रोप । अहंतेचें ।।७७७।।
मग काया-वाचा । मनोभावें मातें । सेविती जे येथें । कर्मद्वारा ।।७७८।।
देहधारी तरी । होती [5]देहातीत । राहती ते भक्त । माझ्याठायीं ।।७७९।।

---

१ योग्य मनुष्य.   २ मजुरी.   ३ जळलेली; भाजलेलीं.   ४ गढून गेलेला.   ५ देहाच्या पलीकडचे.

आणि मी हि राहें । धनंजया जाण । हृदयीं संपूर्ण तयांचिया ।।७८०।।
बीजीं वट-वृक्ष । सामावोनि राहे । बीजकण आहे । वटीं जैसा ।।७८१।।
तैसें तयां आम्हां । पाहें परस्पर । बाहेरी अंतर । नांवाचें चि ।।७८२।।
परी अंतरंग । वस्तूचा विचार । करितां साचार । मद्रूप ते ।।७८३।।
घालोनियां गळां । [1] आणिकांचें लेणें । जैसें मिरवणें । वरिवरी ।।७८४।।
तैसें तयांचें तें । शरीर-धारण । ते तों उदासीन । सर्वथैव ।।७८५।।
सुगंध निघोनि । जाय वाऱ्यासंगें । बासें फूल मागें । उरे देठीं ।।७८६।।
तैसा आयुष्याच्या । मुठीमाजीं देख । देह मात्र एक । उरे त्यांचा ।।७८७।।
परी भक्ति-बळें ।अहंता सकळ । बैसली केवळ । माझ्या ठायीं ।।७८८।।

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्य: सम्यग्व्यवसितो हि स: ।।३०।।

ऐशा प्रेमभावें । भजेल जो मातें । मागुतीं तयातें । जन्म नाहीं ।।७८९।।
मग कोण पुसे । त्याचे जाति-वर्ण । कोण आचरण । पाहे त्याचें ? ।।७९०।।
असो नीच योनि । असो पापराशि । जीवन जयासी । भक्ति-मार्ग ।।७९१।।
अंतीं मति जैसी । पुढें गति तैसी । म्हणोनि भक्तीसी । वाहिला जो ।।७९२।।
अर्जुना, तो आधीं । जरी दुराचारी । तरी तो निर्धारीं । सर्वोत्तम ।।७९३।।
बुडाला हि कोणी । जैसा महा-पुरीं । निघाला बाहेरी । जगोनियां ।।७९४।।
राहोनि जिवंत । [2] ऐलथडी आला । तरी तो बुडाला । म्हणूं ये का ? ।।७९५।।
तैसा पार्था, झाला । जो का ज्ञानी भक्त । जळालें [3] दुष्कृत । सर्व त्याचें ।।७९६।।
म्हणोनियां होय । आधीं जरी पापी । [4] अनुतापरूपी । तीर्थीं मग ।।७९७।।
करोनियां स्नान । झाला तो [5] पावन । मातें उपासून । सर्वभावें ।।७९८।।
तरी तयाचें चि । पवित्र तें कुळ । जन्म तो निर्मळ । तयाचा चि ।।७९९।।
जन्मोनियां तो चि । जाहला कृतार्थ । सकळ शास्त्रार्थ । तो चि जाणे ।।८००।।
तेणें चि * अष्टांग । अभ्यासिला योग । तेणें तप चांग । आचरिलें ।।८०१।।
जया माझे ठायीं । अखंड आवडी । पावे [6] पैलथडी । कर्माची तो ।।८०२।।

---

१ दुसऱ्याचा दागिना. २ ह्या कडेला. ३ पाप. ४ पश्चात्ताप. ५ पवित्र. ६ पलीकडील तीर.

असो जेणें मनो–। बुद्धीचे साचार । सर्व हि व्यापार । करोनियां ॥८०३॥
एकनिष्ठारूपी । भरोनियां पेटी । ठेविली किरीटी । मजमाजीं ॥८०४॥

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्त: प्रणश्यति ॥३१॥

पावेल तो भक्त । मज कालांतरीं । म्हणशील जरी । ऐसें पार्था ॥८०५॥
तरी नित्य करी । अमृतीं जो [१] वास । बाधेल तयास । काय मृत्यु ? ॥८०६॥
जिये वेळीं नाहीं । सूर्याचा उदय । बोलती समय । रात्रीचा तो ॥८०७॥
माझ्या भक्तीविण । तैसें जें जें होय । तें तें नव्हे काय । महा-पाप ? ॥८०८॥
म्हणोनियां आतां । तयांचिया चित्ता । माझी प्राप्त होतां । जवळीक ॥८०९॥
पावला तो माझें । तत्त्वतां स्वरूप । राहिला मद्रूप । होवोनियां ॥८१०॥
कोणता [२] आदील । नये ओळखितां । दीपें चि लावितां । दुजा दीप ॥८११॥
तैसा भजे मातें । सर्वस्व मानोन । मी च तो होवोन । ठाके पार्था ॥८१२॥
मग नित्य शांति । माझी स्थिति [३] कांति । सर्व हि तीं होती । तया प्राप्त ॥८१३॥
किंबहुना पार्था । माझिया जीवें च । जिवंत तो साच । राहतसे ॥८१४॥
आतां ऐशापरी । करोनि विस्तार । तें चि वारंवार । किती सांगूं ॥८१५॥
जरी माझी प्राप्ति । इच्छिसी साचार । न पडो विसर । भक्तीचा गा ॥८१६॥
निर्मळ तें कुळ । कासयासी व्हावें । कासया [४] वानावें । कुलीनत्व ॥८१७॥
कासयासी व्यर्थ । पांडित्याची हांव । तारुण्याचा गर्व । कासयासी ॥८१८॥
कां गा मिरवावें । सौंदर्य तें फोल । संपत्तीचा डौल । कासयासी ॥८१९॥
पार्था, जरी नाहीं । एक माझी भक्ति । निष्फळ तीं होती । जाण सर्व ॥८२०॥
दाण्याविण जैसीं । कणिसें फोलट । काय [५] घनदाट । लागोनियां ॥८२१॥
काय करावी ती । सुरम्य नगरी । नसे तेथें जरी । लोकवस्ती ॥८२२॥
एक दु:खी कष्टी । वनीं हिंडे साच । दुजें हि तैसेंच । तया भेटे ॥८२३॥
किंवा सरोवर । आटोनियां गेलें । झाड बहरलें । वांझ [६] फुलीं ॥८२४॥
तैसें कुळ-जाति–। गौरव सकळ । वैभव निष्फळ । जाणावें तें ॥८२५॥

---

१ राहणे; वस्ती. २ अगोदरचा. ३ तेज. ४ वाखाणावें. ५ भरगच्च. ६ फुलांनी.

आहे [१]सावयव । शरीर तें पाहीं । जीवचि तो नाहीं ॥ परी त्यांत ॥८२६॥
तैसें भक्तिवीण । जळो तें जीवन । भूवरी पाषाण । काय थोडे ? ॥८२७॥
*हिंवर-तरूची । दाट छाया झाली । तरी ती [२]वाळिली । सज्जनांनीं ॥८२८॥
तैसें [३]पुण्यजात । धनंजया जाण । गेलें [४]डावलोन । अभक्तांतें ॥८२९॥
निंब निंबोळ्यांनीं । ओथंबोन आला । सुकाळ तो झाला । कावळ्यांसी ॥८३०॥
तैसा भक्ति-हीन । करंटा केवळ । वाढला सकळ । दोषांसाठीं ॥८३१॥
षड्रस पक्वान्न । खापरीं वाढोन । ठेविलें नेवोन । चव्हाट्यांत ॥८३२॥
तरी तें खावोन । टाकिती श्वानें च । तैसें जिणें साच । अभक्तांचें ॥८३३॥
अर्जुना, स्वप्नीं हि । सुकृत जो नेणे । आमंत्रिलें तेणें । भव-दुःखां ॥८३४॥
म्हणोनियां कुळ । नसो तें निर्मळ । असो कीं चांडाळ । हीन-जाति ॥८३५॥
त्या हि वरी होवो । पशु-देह-प्राप्ति । परी माझी भक्ति । चुकूं नये ॥८३६॥
पाहें *गजेंद्रानें । केला माझा धांवा । पाय नक्रें जेव्हां । धरियेला ॥८३७॥
सर्वभावें मज । येतां चि शरण । तया दिलें स्थान । माझ्या ठायीं ॥८३८॥
तयाचें का आलें । पशुत्व तें आड । भक्तीचा [५]पवाड । ऐसा जाण ॥८३९॥

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥३२॥

उच्चारितां ज्यांचीं । नांवें हि वाईट । ऐसे जे कनिष्ठ । पाप-योनि ॥८४०॥
असोत ते मूढ । जैसे का दगड । परी भक्ति दृढ । माझ्या ठायीं ॥८४१॥
जयांचिये वाचे । माझे चि आलाप । माझें चि स्वरूप । दृष्टी भोगी ॥८४२॥
माझा चि संकल्प । जयांचें गा मन । वाहे रात्रं-दिन । आवडीनें ॥८४३॥
तेविं माझिया चि । गुण-कीर्तिवीण । ऐकती ना कान । दुजें कांहीं ॥८४४॥
माझी सेवा हें चि । सर्वांगसंपूर्ण । जाहलें भूषण । जयांलागीं ॥८४५॥
जयांलागीं मज । एकाचें चि ज्ञान । जयां नाहीं भान । विषयांचें ॥८४६॥
ऐसी स्थिति होय । तरीच जीवन । एऱ्हवीं मरण । ऐसें वाटे ॥८४७॥
सर्वांपरी ऐसा । जीवनीं आधार । जाहलों साचार । मी चि जयां ॥८४८॥

---

*परिशिष्ट पहा. १ सर्व अवयव असलेलें. २ वर्ज्य केली. ३ सर्व पुण्यें. ४ बाजूला टाकून. ५ थोरवी.

नसोत ते शास्त्री । किंवा [१] बहुश्रुत । आणि नीच जात । असो त्यांची ॥८४९॥
परी माझ्या संगें । [२] तोलितां ते साच । न्यूनता नाहीं च । तयां ठायीं ॥८५०॥
नरसिंह-रूप । घेतलें ज्यासाठीं । काय वानूं भक्ति । * प्रल्हादाची ॥८५१॥
दैत्य-कुळीं जन्म । परी भक्ति-बळें । तेणें लाजविलें । देवांतें हि ॥८५२॥
मनोभावें केली । तयाची हि भक्ति । तरी माझी प्राप्ति । होय तेणें ॥८५३॥
एऱ्हवीं साचार । दैत्य-कुळ तरी । इंद्रास हि सरी । नाहीं त्याची ॥८५४॥
म्हणोनियां येथें । भक्ति एक पुरे । जाति-वर्ण सारें । अप्रमाण ॥८५५॥
असो कातड्याचा । तुकडा च परी । अक्षरें त्यावरी । राजाज्ञेचीं ॥८५६॥
तरी तेणें जोडे । येथें सर्व कांहीं । सोनें रुपें तें हि । गौण ठरे ॥८५७॥
कैसें राजाज्ञेचें । सामर्थ्य तें पाहें । सर्व लाभताहे । [३] तेणें [३] चर्में ॥८५८॥
मनोबुद्धीमाजीं । तैसें सर्वकाळ । [४] संचलें निर्मळ । प्रेम माझें ॥८५९॥
तरी उत्तमत्व । तया झालें प्राप्त । सर्वज्ञ तो होत । स्वभावें चि ॥८६०॥
म्हणोनि उत्तम । कुळ जाति वर्ण । सर्व हि तें जाण । निरर्थक ॥८६१॥
जरी माझ्या ठायीं । दृढ भाव एक । तरी च सार्थक । जीवनाचें ॥८६२॥
पार्था, असो भाव । कोणता हि मनीं । परी घ्यावें ध्यानीं । माझें रूप ॥८६३॥
ऐशा परी मन । मद्रूप तें होतां । कोण पुसे आतां । जाति-कुळ ॥८६४॥
वहाळ वोहळ । तोंवरी वेगळे । जोंवरी मिळाले । नाहीं गंगे ॥८६५॥
मग गंगेमाजीं । मिळतां ते जाण । राहती होवोन । गंगा-रूप ॥८६६॥
[५] खैर-काष्ठ किंवा । चंदनी लांकूड । घडे हि निवड । तोंवरी च ॥८६७॥
जोंवरी तीं सारीं । पडोनि अग्नींत । पावती ना तेथ । अग्नि-रूप ॥८६८॥
स्त्रिया शूद्र वैश्य । क्षत्रिय ह्या जाति । तोंवरी च होती । भिन्न तैशा ॥८६९॥
जोंवरी तीं सर्व । करोनियां भक्ति । पावती ना अंतीं । माझें रूप ॥८७०॥
सागरामाझारीं । लवणाचे कण । घालितां विरोन । जाती जैसे ॥८७१॥
तैसीं भावें होतां । मद्रूपीं तीं लीन । मग जाति वर्ण । उरे कोठें ? ॥८७२॥
नदी नद पूर्व–। पश्चिम-प्रवाह । हें तों निःसंदेह । तोंवरी च ॥८७३॥

---

१ विद्वान; पंडित. २ तुलना केली तर. ३ त्या चामड्यानें. ४ भरून राहिलें. ५ खैराचें लांकूड.

जोंवरी तीं सारीं । सागरीं मिळोन । सागर होवोन । राहिलीं ना ॥८७४॥
कोणें [1] मिषें चित्त । रिघो माझे ठायीं । मद्रूप तें होई । आपोआप ॥८७५॥
लोह परिसासी । गेलें फोडावया । तरी लाभे तया । सुवर्णत्व ॥८७६॥
गोपिकांनीं मज । [2] भावोनियां पति । नाहीं काय प्राप्ति । केली माझी ॥८७७॥
*कंस तो हि माझें । धरोनियां भय । झाला नाहीं काय । मद्रूप चि ॥८७८॥
करोनियां वैर । *शिशुपालादिकां । मिळाला नाहीं का । माझा लाभ ॥८७९॥
तेविं सोयरिक । जोडोनियां पार्था । माझी [3] सायुज्यता । यादवांसी ॥८८०॥
धरोनि ममत्व । वसुदेवादिक । पावले गा देख । मद्रूपता ॥८८१॥
*नारद *अक्रूर । *ध्रुव माझे भक्त । तयांसी मी प्राप्त । भक्ति-भावें ॥८८२॥
*शुक-*सनकादिक । घेवोनियां ध्यास । माझिया पदास । पावले गा ॥८८३॥
तैसा काम-भावें । लाभलों गोपींस । भय-भ्रमें कंस । मद्रूप तो ॥८८४॥
शिशुपालादिक । करोनियां वैर । पावले साचार । मद्रूपता ॥८८५॥
प्रपंचीं विरक्ति । किंवा माझी भक्ति । माझ्या ठायीं प्रीति । किंवा वैर ॥८८६॥
कोणत्या हि मार्गें । लागो माझा ध्यास । तरी लाभे त्यास । सायुज्यता ॥८८७॥
म्हणोनियां मातें । पावावया पाहीं । उपायांची नाहीं । [4] वाण येथें ! ॥८८८॥
आणि कोणत्या हि । जातींत जन्मून । करावें भजन । किंवा वैर ॥८८९॥
परी भक्त एक । माझा चि गा व्हावें । वैर हि करावें । माझ्याशीं च ॥८९०॥
१६ कोणें मिषें जडो । माझ्या ठायीं वृत्ति । मद्रूप ते होती । निःसंदेह ॥८९१॥
ह्या चि लागीं वैश्य । शूद्र स्त्रिया कोणी । किंवा *पाप-योनि । होती जे का ॥८९२॥
पार्था तयांतें हि । होते माझी प्राप्ति । करोनियां भक्ति । मनोभावें ॥८९३॥

किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।
अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥३३॥

मग वर्णामाजीं । श्रेष्ठ जे ब्राह्मण । स्वर्ग हें वतन । जयांचें गा ॥८९४॥
मंत्रविद्येलागीं । माहेर जे होती । जे का तपोमूर्ति । [5] भूमि-देव ॥८९५॥
सर्व हि तीर्थांचा । जे का भाग्योदय । अखंड आश्रय । यज्ञांसी जे ॥८९६॥

---

*परिशिष्ट पहा.　१ निमित्ताने.　२ मानून; समजून.　३ ऐक्य.　४ तुटवडा.　५ पृथ्वीवरील देव.

D:\Dyaneshwari_2007\ADA9_203-246 ....241

वेद सुरक्षित । जयांचें गा साच । [१] अभेद्य [२] कवच । लेवोनियां ॥८९७॥
जयांचियां दृष्टी-। रूप मांडीवर । [३] मांगल्य साचार । वाढतसे ॥८९८॥
जयांच्या आस्थेचें । लाभतां चि ओल । विस्तारला वेल । सत्कर्माचा ॥८९९॥
आणि जयांचिया । संकल्पेंकरोन । सत्यासी जीवन । लाभलें गा ॥९००॥
तेविं जयांचिया । आशीर्वादें भलें । आयुष्य वाढलें । * अग्नीचें हि ॥९०१॥
म्हणोनि तयांच्या । प्रीतीसाठीं दिलें । * सागरे आपुलें । तोय त्यासी ॥९०२॥
रमादेवीतें हि । सारोनियां दूर । कौस्तुभालंकार । काढोनियां ॥९०३॥
मग पुढें केलें । निज वक्ष:स्थळ । लागो पायधूळ । म्हणोनियां ॥९०४॥
आपुलें ऐश्वर्य । करावें जतन । म्हणोनि भूषण । मिरवोनि ॥९०५॥
* भृगु ऋषींची ती । पाउलाची खूण । वाहतों अजून । वक्षस्थळीं ॥९०६॥
काळाग्निरुद्रातें । रहावया घर । ऐसा चि प्रखर । कोप ज्यांचा ॥९०७॥
तेविं अनायासें । सिद्धि येती हाता । जयांचा लाभतां । आशीर्वाद ॥९०८॥
ऐसे पुण्यवंत । ब्राह्मण जे थोर । आणिक तत्पर । माझ्या ठायीं ॥९०९॥
पावती ते मातें । आतां धनंजया । सिद्ध करावया । हवें का हें ? ॥९१०॥
जे का चंदनाच्या । ठेले सान्निध्यांत । होती सुगंधित । निंबवृक्ष ॥९११॥
तयांचें हि गंध । उगाळूनि भलें । देवांची [४] निढळें । भूषविती ॥९१२॥
मग तो चंदन । न पोंचे त्या स्थानीं । ऐसें कैसें मनीं । धरावें गा ? ॥९१३॥
पोंचे ऐसें म्हणूं । तरी च तें साच । ना तरी नाहीं च । म्हणूं ये का ? ॥९१४॥
[५] शमवाया [६] दाह । मस्तकीं शंकर । वाहे निरंतर । चंद्र-कोर ॥९१५॥
तेथ निववविता । आणिक संपूर्ण । थोर चंद्राहून । सुगंधें जो ॥९१६॥
ऐसा तो चंदन । लीलामात्रें जाण । सर्वांगीं भूषण । कां न व्हावा ? ॥९१७॥
रस्त्यांतील तोय । गंगेचा आश्रय । करोनियां जाय । सागरातें ॥९१८॥
सागरीं तद्रूप । ऐशापरी पाहीं । जरी होय तें हि । अनायासें ॥९१९॥
सागरावांचोन । मग गंगे-प्रति । सांगें अन्य गति । असे काय ? ॥९२०॥
म्हणोनि राजर्षि । आणिक साचार । ब्राह्मण जे थोर । माझे भक्त ॥९२१॥

---

* परिशिष्ट पहा. १ न फुटणारें. २ चिलखत. ३ पवित्रता. ४ कपाळें. ५ शांत करायला. ६ आग.

काया-वाचा-मनें । मी च एक जाण । आश्रयाचें स्थान । जयांलागीं ॥९२२॥
तयां लाभतें च । माझें [१] परं-धाम । मूर्त परब्रह्म । सर्वथा ते ॥९२३॥
अगा, [२] शत छिद्रें । असती ज्या [३] नावे । त्यांत चि बैसावें । लागे जरी ॥९२४॥
तरी कैसें तेथें । रहावें निश्चिंत । दुर्लक्षून पंथ । रक्षणाचा ? ॥९२५॥
शस्त्रांचा वर्षाव । रणीं होय जेथें । हिंडावें का तेथें । उघडें च ? ॥९२६॥
किंवा आदळतां । अंगावरी धोंडे । केवीं ढाल पुढें । करावी ना ? ॥९२७॥
रोगें परिपूर्ण । व्यापितां देहास । औषधीं उदास । रहावें का ? ॥९२८॥
चहूंकडे आग । पेटतां तेथोन । न जावें निघोन । कैसें सांग ? ॥९२९॥
तेविं दु:खरूप । संसारीं जन्मून । कां माझें भजन । करावें ना ? ॥९३०॥
अगा माझी भक्ति । करूं नये ऐसें । काय बळ असे । प्राणियासी ? ॥९३१॥
घराचिया किंवा । भोगांचिया बळें । सांगें काय झाले । निश्चिंत हे ? ॥९३२॥
ना तरी विद्येचें । ह्यांसी बळ थोर । वाटे का आधार । तारुण्याचा ? ॥९३३॥
न करितां भक्ति । व्हावया निश्चिंत । भरंवसा येथ । कोण ह्यांसी ? ॥९३४॥
तरी पार्था जें जें । [४] भोग्यजात देख । तेणें लाभे सुख । देहाचें चि ॥९३५॥
आणि येथें देह । तंव पाहूं जातां । भक्ष्य तें सर्वथा । काळाचें गा ॥९३६॥
नर-देह-रूप । मांडला बाजार । अर्जुना साचार । शेवटील ॥९३७॥
दु:खरूप माल । भरला अमूप । जेथें चाले माप । मरणाचें ॥९३८॥
त्या ह्या मृत्युलोकीं । जन्मोनि सर्वथा । सुख पाहूं जातां । कैसें लाभे ? ॥९३९॥
फुंकितां राखोंडी । काय दीप लागे । धनंजया सांगें । मजलागीं ॥९४०॥
अगा विष-कंद । वाटोनियां चांग । सेवावा जो मग । रस त्याचा ॥९४१॥
तया रसा द्यावें । अमृत हें नांव । आणि चिरंजीव । व्हावें जैसें ! ॥९४२॥
ना तरी तोडोनि । मस्तक आपुलें । [५] क्षतीं तें बांधिलें । पायांचिया ॥९४३॥
मृत्यु-लोकांतील । सर्व व्यवहार । तैसा चि साचार । भला देखें ! ॥९४४॥
म्हणोनि ह्या लोकीं । सुखाची कहाणी । पडेल श्रवणीं । ऐसें नाहीं ॥९४५॥
सांग विस्तवाचे । अंथरुणावरी । लागेल का तरी । सुख-निद्रा ? ॥९४६॥

---

१ श्रेष्ठ असें स्थान. २ शेकडों छिद्रें (भोके), ३ होडीला. ४ सर्व विषयोपभोग. ५ जखमेला.

पाहें जिया लोकीं । *चंद्र क्षयग्रस्त । उदय तो होत । अस्तासाठीं ॥९४७॥
[१]सुख-प्रावरण । [२]लेवोनियां देख । छळीतसे दुःख । प्राणियासी ॥९४८॥
जेथें मंगळाचा । अंकुर जों फुटे । तों चि सर्वे भेटे । अमंगळ ॥९४९॥
आणि पोटांतील । गर्भासी हि जेथ । येतसे शोधीत । महा-मृत्यु ॥९५०॥
नाहीं तयाची च । जंव चिंता चाले । तंव तें हि गेलें । हारपोनि ॥९५१॥
आणि केव्हां कोठें । कोणी कैसें नेलें । कांहीं च ना कळे । धनुर्धरा ॥९५२॥
मृत्यू-मुखीं गेलें । न ये परतून । शोधितां कोठून । सांपडावें ॥९५३॥
जेथें निरंतर । मरणाच्या गोष्टी । पुराणें हि होती । तयांचीं च ॥९५४॥
कर्ता ब्रह्मदेव । तयासी हि अंत । ऐसें [३]अशाश्वत । सर्व जेथें ॥९५५॥
जिया मृत्युलोकीं । ऐसी नांदणूक । पावले जे लोक । जन्म तेथें ॥९५६॥
नवल हें कैसें । मज उपेक्षून । निश्चिंत बेभान । राहती ते ! ॥९५७॥
इह-परलोकीं । व्हावया कल्याण । कवडी हि जाण । वेंचिती ना ॥९५८॥
परी जेथें होय । सर्वस्वाची हानि । वेंचिती कोटींनीं । द्रव्य तेथें ॥९५९॥
भोग-विलासीं जो । राहिला गुंतोन । तया सुखासीन । नांव देती ॥९६०॥
आणि [४]तृष्णा-भार । जयाचा अपार । बोलती तो थोर । ज्ञाता ऐसें ॥९६१॥
जयाचें आयुष्य । राहिलें थोडें च । बळ बुद्धि साच । [५]ओहोटलीं ॥९६२॥
तया वृद्धालागीं । वडील मानोन । वंदिती चरण । तयाचे गा ॥९६३॥
करोनि कौतुक । नाचती आनंदें । जों जों बाळ वाढे । वरिवरि ॥९६४॥
आंतुनी आयुष्य । कमी होत जाई । तिळमात्र नाहीं । खंती त्याची ! ॥९६५॥
जन्मल्यापासून । दिसंदीस जाण । काळाच्या स्वाधीन । होऊं लागे ॥९६६॥
साजरा करिती । परी वाढ-दिन । गुढ्या उभारून । आनंदानें ॥९६७॥
'अगा मर' ऐसा । साहती ना बोल । मरतां सकळ । आक्रंदती ॥९६८॥
ओहटे आयुष्य । जरी क्षणोक्षणीं । घेती ना हें ध्यानीं । मूढपणें ॥९६९॥
मुखीं जैसा सर्पे । धरिला बेडूक । वेंटाळितो देख । माशीलागीं ॥९७०॥
तैसा प्राणियासी । नेणों काय लाभ । आशा तृष्णा लोभ । वाढवोनि ॥९७१॥

---

*परिशिष्ट पहा. १ सुखाचा बुरखा. २ घेऊन. ३ न टिकणारें. ४ आशेचें ओझें; हांव. ५ कमी झाली.

पाहोनि व्यवहार । ऐसा उफराटा । अंगावरी कांटा । उभा राहे ॥९७२॥
अरे ! हा ! हा ! ऐशा । मृत्युलोकीं येथ । पार्था, अवचित । जन्मलासी ॥९७३॥
तरी आतां वेगें । झाडोनियां अंग । नीघ नीघ नीघ । बाहेरी तूं ॥९७४॥
भक्ति-पंथा लाग । तेणें चि गा मग । पावसी [१] अव्यंग । रूप माझें ॥९७५॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायण: ॥३४॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे राजविद्या-राजगुह्ययोगो नाम
नवमोऽध्याय: ॥९॥

सदा माझे ठायीं । ठेवोनियां मन । करीं तूं भजन । प्रेम-भावें ॥९७६॥
मज एकासी च । नित्य निरंतर । करीं नमस्कार । सर्वांठायीं ॥९७७॥
समूळ संकल्प । टाकावा जाळोन । [२] मदनुसंधान । राखोनियां ॥९७८॥
पार्था, हें चि माझें । निर्मळ यजन । जेणें होय मन । [३] निर्विकल्प ॥९७९॥
संकल्प-विकल्प । जातां आपोआप । सर्वथा मद्रूप । होसील तूं ॥९८०॥
अर्जुना, हें माझें । अंतरींचें गुज । सांगितलें तुज । आज येथें ॥९८१॥
सर्वां हि पासून । निज-गुह्य-ज्ञान । पार्था, लपवून । ठेविलें जें ॥९८२॥
ह्या चि भक्तिपंथें । लाभोनि तें तुज । होशील सहज । सुख-रूप ॥९८३॥
ऐसें बोले भक्त-। काम-कल्पद्रुम । देव मेघश्याम । परब्रह्म ॥९८४॥
धृतराष्ट्रालागीं । म्हणे तो संजय । ध्यानीं आला काय । संवाद हा ? ॥९८५॥
परी कांहीं केल्या । उठे चि ना [४] म्हैसा । पूरांतून जैसा । नदीचिया ॥९८६॥
वृद्ध धृतराष्ट्र । तैसा स्तब्ध राही । तयासी तों नाहीं । गोडी तेथें ॥९८७॥
डोलविली मान । संजयें आपुली । म्हणे वृष्टि झाली । अमृताची ॥९८८॥
परी धृतराष्ट्र । असोनि तेथें च । जणूं गेला [५] साच । दूर गांवा ॥९८९॥
कैसा असो परी । आमुचा हा [६] स्वामी । तयासी हें आम्ही । बोलूं जरी ॥९९०॥
तरी वाचेलागीं । लागेल ना दोष । म्हणोनि विशेष । नको आतां ॥९९१॥

---

१ निर्दोष. २ माझें सतत स्मरण. ३ कल्पनारहित. ४ रेडा. ५ खरोखर. ६ धनी; मालक.

काय म्हणूं ह्याचा । ऐसा चि स्वभाव । परी किती दैव । थोर माझें ।।९९२।।
धृतराष्ट्रालागीं । सांगावा वृत्तांत । करोनि निमित्त । हें चि आज ।।९९३।।
जन्म-मृत्यूंतून । सोडविलें मज । कैसें मुनिराज । व्यासदेवें ।।९९४।।
ऐसें जंव दीर्घ-। सायासें तो बोले । करोनि आपुलें । दृढ मन ।।९९५।।
तों चि ते *सात्त्विक । भाव प्रकटले । जरी आवरले । नावरती ।।९९६।।
होवोनि चकित । आटूं लागे चित्त । पांगुळली तेथ । वाचा ती हि ।।९९७।।
पायांपासोनियां । मस्तकापर्यंत । झालें रोमांचित । सर्व अंग ।।९९८।।
[१] अर्ध-उन्मीलित । लोचनांमधून । वाहती निघून । आनंदाश्रु ।।९९९।।
उचंबळे सुख । अंतरीं अमूप । म्हणोनियां कंप । शरीरातें ।।१०००।।
[२] रोम-रंध्रांतून । [३] स्वेद-बिंदु आले । ल्याला जणुं जाळें । मोतियांचें ।।१००१।।
महा-सुखें ऐसा । भरे अंत:प्रांत । जीवदशा तेथ । आटूं लागे ।।१००२।।
आणि व्यासें आज्ञा । केली जी साचार । तयाचा विसर । पडूं पाहे ।।१००३।।
तों चि पार्थालागीं । बोले चक्रपाणी । तें चि आलें कानीं । घोघावत ।।१००४।।
तेणें घोषें तया । आलें देहभान । टाकिले पुसून । मग अश्रु ।।१००५।।
सर्वांगाचा घाम । घेतला टिपून । मग उल्हासून । संजय तो ।।१००६।।
धृतराष्ट्रालागीं । म्हणे अवधारा । अहो जी दातारा । संवाद हा ।।१००७।।
संजयाची भूमि । सात्त्विक सुपीक । बीज निवडक । कृष्ण-वाक्य ।।१००८।।
म्हणोनि प्रमेय-। पिकाचा सुकाळ । होईल सकळ । श्रोतयांस ।।१००९।।
अहो श्रोते-जन । सकळ सज्जन । द्यावें अवधान । [४] अळुमाळ ।।१०१०।।
तेणें तुम्ही व्हाल । स्वानंदाचे धनी । लोटलें श्रवणीं । भाग्य आज ।।१०११।।
म्हणोनि दावील । विभूतींचा ठाव । सिद्धांचा तो राव । अर्जुनासी ।।१०१२।।
ती च कथा ऐका । धरोनियां भाव । म्हणे ज्ञानदेव । निवृत्तीचा ।।१०१३।।

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी

नवमोऽध्याय: ।

हरये नम: । हरये नम: । हरये नम: । श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

*परिशिष्ट पहा.	१ अर्धे उघडलेले.	२ केसाकेसांच्या छिद्रांतून.	३ घामाचे थेंब.	४ किंचित्; थोडेसें.